दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | रविवार,दि.२० एप्रिल २०२५ |वर्षे४थे| अंक२४८वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# ...म्हणून त्यांनी माझे सरकार पाडले



Inside Story

दिल्लीला बसलेले दोन भाजपावाले फसवताहेत | त्या तरतुदीला आमचा विरोध होता | इथे भाजपाच्या मनातल्या काळ्या गोष्टी उघड

## उद्धव ठाकरे स्पष्टच बोलले, अन् सांगितले

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:वक्फ बोर्ड, भाषा सक्ती यावरुन भांडणे लावायची आणि विधेयके संमत करावी, अशी कामे सरकार करत आहे. ज्या प्रमाणे शेतकरी रस्त्यावर उतरला, त्याप्रमाणे कामगार रस्त्यावर उतरला नाही. कोणीही एकत्र येता कामा नये हेच त्यांचे मिशन आहे. कोणालाही संघटित होऊ द्यायचे नाही, दबावाखाली ठेवायचे, चिंताग्रस्त ठेवायचे अन् आपले हित साध्य करून घ्यायचे, अशी त्यांची रणनीती सुरू आहे, असे सांगत उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि केंद्र सरकारवर टीकास्त्र सोडले.आगामी मुंबईसह राज्यभरातील महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारणात वेगवान घडामोडी घडताना पाहायला मिळत आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे ठाकरे बंधू एकत्र येण्याबाबत पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात चांगल्याच चर्चा सुरू झाल्या आहेत. राज ठाकरे यांच्याकडून पुन्हा एकदा राजकीय युतीसाठी हात पुढे केलेला हात आणि उद्धव ठाकरे यांचा प्रतिसाद यामुळे या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे. या घडामोडी सुरू असताना महाविकास आघाडीचे सरकार पडल्याबाबत उद्धव ठाकरे यांनी भाष्य करताना, त्यावेळेस काय घडले, हे सांगितले. भारतीय कामगार सेनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उद्धव ठाकरे बोलत होते.

### भाजपाच्या मनातल्या काळ्या गोष्टी

अरविंद तुम्ही केंद्रीय मंत्री होता आणि मी मुख्यमंत्री होतो, तेव्हा आपण काय–काय केले आणि काय–काय होऊ दिले नाही, त्या बद्दल सांगितले, हाच मुद्दा आहे.ज्या क्षणी माझ्या लक्षात आले की, दिल्लीला बसलेले दोन भाजपावाले फसवत आहेत. मी अरविंदला फोन केला. त्याला सांगितले की, राजीनामा द्यावा लागेल. त्यावर अरविंदने कशासाठी? माझे काय चुकले? असे न विचारता, येस सर बोलून राजीनामा देऊन आले. एक केंद्रीय मंत्री आपल्या मंत्रिमंडाळातून राजीनामा देत आहे, तर पंतप्रधान, पक्षाध्यक्षांना त्याला विचारावस वाटले नाही की, का राजीनामा देताय. इथे भाजपाच्या मनातल्या काळ्या गोष्टी उघड झाल्या. त्यांना अरविंद नको होता. अरविंदने राजीनामा दिल्यानंतर त्यांनी ना अरविंदला थांबवले, ना मला फोन केला.

### हिंदी बोलले म्हणजे हिंदू नाही

वक्फ बोर्ड विधेयकात गैर मुस्लीम व्यक्ती वक्फ बोर्डावर नियुक्ती करण्याची तरतूद होती. त्या तरतुदीला आमचा विरोध होता. आम्ही जो प्रश्न विचारला तोच प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला. गैर मुस्लीम लोक वक्फ बोर्डावर घेतले जातील, मग उद्या मंदिरांमध्ये गैर हिंदूंच्या नियुक्ती करणार नाही, याची काय खात्री आहे. आंधळेपणे आम्ही पाठिंबा देणार नाही. हिंदी बोलले म्हणजे हिंदू नाही. आम्ही मराठी बोलणारे कट्टर तुमच्यापेक्षा जास्त देशाभिमानी हिंदू आहोत, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

### मॅक्सने सरकार पडले

मी विरोध केल्यामुळे मी असलेला कसा चालेल, कारण आम्हाला उद्योगपतींचे खिसे भरायचे आहेत. मग उद्धव ठाकरेंचे सरकार पाडा. म्हणून त्यांनी माझे सरकार पाडले. तुमचे सरकार पाडले. काळे कृत्य करून त्यांनी तुमच्या हक्काचे सरकार, या कारणाने पाडले, असा दावा उद्धव ठाकरे यांनी केला.

# महिला सरपंचाला न्याय कधी?

## बोंबला:ग्रामसेवकाची मनमानी थांबेना

पुण्यभूमी प्रतिनिधी




केजः अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा खुर्द गावच्या सरपंच पार्वतीबाई महादेव पौळ यांनी डिसेंबर २०२२ ला सरपंच पदाचा कार्यभार घेतला होता. ग्रामसेवकांनी अडीच वर्षात गावात अनेक विकास कामे सरपंच पार्वतीबाई पौळ यांच्या परस्पर केली आहेत. गावात गेल्या अडीच वर्षापासून ग्रामसेवक यांचा मनमानी कारभार सुरू आहे.

सरपंच पार्वतीबाई पौळ यांनी अडीच वर्षात चार वेळा तक्रारी अर्ज देऊन देखील गट विकास अधिकारी यांनी सरपंचांना न्याय दिला नाही. जिल्हा परिषद बीड चे सिओ धानोरा खुर्द गावच्या सरपंच पार्वतीबाई पौळ यांना न्याय देतील का असा सर्वसामान्य नागरिकांना प्रश्न पडला आहे.कार्यभार स्वीकारून अडीच वर्षे लोटली तरीही सरपंचाच्या परस्पर गावातील सर्व कामे ग्रामसेवक करत आहेत. गावातील होणारे सर्व विकासकामे सरपंच पार्वती महादेव पौळ यांच्या परस्पर केले जातात. सरपंच फक्त किरकोळ कामाच्या सहीच्या मालक राहिले आहेत. ग्रामपंचायतचे अनेक खाते माजी सरपंच आणि ग्रामसेवक यांच्या नावे आहेत. सरपंच पार्वतीबाई पौळ यांची डिजिटल सिग्नेचर देखील त्यांच्याकडे नाही. अडीच वर्षात गावात अनेक विकास कामे झाले आहेत. हे काम करत असताना सरपंचांना माहिती दिली जात नाही. गावात किती निधी आला आहे तो निधी कोणत्या कामावर खर्च केला जात आहे. याबाबत सरपंचांना कसलीही माहिती » पान २ वर

# रिक्त पोलीस पाटील भरतीचे आदेश

## दिलासा:शंकर देशमुख यांच्या मागणीला यश

पुण्यभूमी प्रतिनिधी



कडा:जिल्ह्यातील ११२२ पोलीस पाटील रिक्त पदांची भरती त्वरित करावी, अशी मागणी भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री बावनकुळे यांचेकडे केली होती. या मागणीची दखल घेऊन मा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी उपविभागीय अधिकारी यांना भरती बाबत आदेश दिले आहेत.

बीड जिल्ह्यात कोरोना काळापासून आजपर्यंत जवळपास ८५ टक्के गावांमध्ये पोलीस पाटील पद रिक्त होते. पोलीस पाटील म्हणजे ग्रामीण भागातील नागरिक अन् प्रशासनामधील एक महत्वाचा दुवा आहे. प्रशासनास गावातील घडामोडी या पोलिस पाटील यांच्यामुळे त्वरीत कळतात. त्यामुळे प्रशासनास शासन चालवणे सोयिस्कर होते. यामुळं ग्रामीण भागातील गुन्हेगारीला आळा बसतो. सद्यास्थितीत बीड जिल्हयामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. पोलीस अशा परिस्थितीत ग्रामीण भागापर्यंत पोहचू शकत नाही. सध्या बीड जिल्हयात जवळपास १३२२ पैकी ११२२ रिक्त पदे आहेत. केवळ २०० पोलिस पाटील कार्यरत आहेत. रिक्त पदभरती झाल्यास » पान २ वर

# रणजित कासले विरोधात फिर्याद

## खळबळ:परळीत ड्युटी नसताना खोटे आरोप

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:विधानसभेच्या निवडणूक प्रक्रियेत किंवा मतमोजणी तसेच ईव्हीएम च्या सुरक्षेच्या संदर्भात कोणतीही ड्युटी नसताना, केवळ खळबळ माजवण्याच्या उद्देशाने खोटे, चुकीचे आरोप करणाऱ्या बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याच्या विरोधात परळीचे तहसीलदार (निवडणूक) यांनी परळी पोलिसात फिर्याद दिली असून, कासले विरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याला निवडणूक, ईव्हीएम मशीन सुरक्षा किंवा मतमोजणी दरम्यान कुठेच परळी विधानसभा मतदारसंघात ड्युटी दिलेली नव्हती. ईव्हीएम मशीन ची सुरक्षा केंद्रीय राखीव पोलीस बल व राज्य राखीव पोलीस दलाचे जवान यांच्या देखरेखीत व पूर्णवेळ सीसीटिव्ही कॅमेरे मध्ये झाली होती. त्यास निवडणूक निरीक्षक तसेच सर्वपक्षीय उमेदवार प्रतिनिधी साक्षीदार आहेत.

मात्र तरीही कासले याने समाज माध्यमांवर व्हायरल केलेल्या व्हिडिओच्या माध्यमातून आपल्याला ईव्हीएम ड्युटी होती, तिथे ड्युटीवर गप्प राहायचे यासाठी मला दहा लाख रुपये देण्यात आले, असे चुकीचे आरोप करत लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी, राज्य सरकार यावर शंका निर्माण होऊन कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण व्हावा त्याचबरोबर निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह व बदनामी तसेच सह देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने शंका उपस्थित करणारे वक्तव्य स्वतः लोकसेवक असताना कासले याने केले असून, त्या विरुद्ध नायब तहसीलदार निवडणूक श्री अण्णा वंजारे यांच्या फिर्यादीनुसार परळी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १७५, ३३६ (४), ३५३ (१– ब), १९८, ३५६ (२), तसेच १९७ (१– ड) या अंतर्गत » पान २ वर

# बराक ओबामा घेणार घटस्फोट

## देशविदेश:मिशेल यांनीच दिले उत्तर



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:मिशेल ओबामा यांनी व्हाईट हाऊसमधून बाहेर पडल्यानंतर 'वर्क इन प्रोग्रेस' पॉडकास्टमध्ये आपल्या आयुष्याबद्दल सांगितले. यावेळी त्यांनी स्वत:ला प्राधान्य देण्यावर भर दिला. बराक ओबामांसोबतच्या राजकीय कार्यक्रमांना अनुपस्थित राहण्याबाबतही त्या म्हणाल्या की, हे वैवाहिक कलहामुळे नाही तर स्वत:ची काळजी घेतल्यामुळे झाले आहे.

मिशेल म्हणाल्या की, मी अनेक वर्षांपूर्वी असे अनेक निर्णय घेऊ शकले असते, परंतु मी स्वतःला ते स्वातंत्र्य दिले नाही. कदाचित मी जेवढं माझ्या मुलांना त्यांचं आयुष्य जगू देईन, तितकंच मी त्यांच्या आयुष्याचा उपयोग मी काहीच का करू शकत नाही?. त्या पुढे म्हणाल्या, आणि आता तो काळ निघून गेला आहे. आणि म्हणून आता मला माझे कॅलेंडर पहावे लागेल, जे मी या वर्षी केले, ते माझ्यासाठी एक उत्तम उदाहरण होते, मी » पान २ वर

# अन्न पदार्थांतले भेसळ ओळखण्याचे प्रशिक्षण

## शैक्षणिक:आदित्य शिक्षण संस्थेचा उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी




बीड:शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अन्न पदार्थांमधील भेसळ ओळखता यावी यासाठी संस्थेच्या वतीने एका कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यामध्ये बीड आणि छत्रपती संभाजीनगर येथील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पत्येक्ष अन्न पदार्थांमधील भेसळ कशी ओळखावी यासाठी प्रात्यक्षिक करून दाखवले.

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षिकाद्वारे प्रत्येक विषयाचा बारीक अभ्यास व्हावा. त्यांना भविष्यात त्या विषयाचे ज्ञान आपल्या करिअरसाठी उपयुक्त व्हावे यासाठी » पान २ वर

### भेसळ ओळखणे अत्यंत आवश्यक

दैनंदिन वापरातील अन्न पदार्थांमध्ये विविध घटकांचा वापर करून भेसळ केली जाते. भेसळ करण्यासाठी अपायकारक पदार्थांचा वापर केला जातो. त्यामुळे अन्नपदार्थांचा दर्जा खालावतो. भेसळ करण्यासाठी सामान्यतः खडू भुकटी, कृत्रिम रंग, लहान–मोठे दगड, लाकडाचा भुस्सा इत्यादी घटकांचा वापर केला जातो. असे भेसळयुक्त पदार्थ खाण्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. त्यामुळे अन्न पदार्थांतील भेसळ ओळखणे अत्यंत आवश्यक असल्याचे कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थित असलेले छत्रपती संभाजीनगरचे सतीश बादाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले. यावेळी त्यांनी भेसळ ओळखण्याच्या पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

अनिल जगताप | उपमुख्यमंत्री शिंदे सर्वसामान्यांचा आधार

# असंख्य तरुणांचा शिवसेनेत प्रवेश!

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुखस अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना



जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटकदगडू दादा गायकवाड यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ, सूरज गायकवाड, अमित गायकवाड, शुभम आखाडे, संदेश सावंत, विशाल उबाळे, दामोदर डोळस, किशोर जाधव, भरत जाधव, सुमित जाधव, वसंत जाधव, प्रशांत दुधाळ, प्रितम दुधाळ, दिपक भराटे, महेश नेवडे, गोपाळ आखाडे, सुशील दुधाळ, औदुंबर दुधाळ, नितिन शेवाळे, दत्ता राऊत, विनोद गायकवाड, रवि दुधाळ, अविनाश कुऱ्हाडे, सोहेल गायकवाड, विनोद गायकवाड, तेजस नाळे, सोनू सुरवसे, अविष्कार दुधाळ, अनय गायकवाड, राम अंकुशे, सचिन अंकुशे, श्याम अंकुशे, प्रतिक दुधाळ, निवास रोकडे, संघर्ष डोंगरे, सौरभ राऊत, बबलू घुमरे, अतुल जगताप, शैलेश आगलावे, दीपक बोबडे यांनी काल दि. १९ रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोडबीड येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटकदगडू » पान २ वर

# ठाकरे बंधू एकत्र येणार?

## युती:आमच्या वादापेक्षा महाराष्ट्र मोठा

पुण्यभूमी प्रतिनिधी



मुंबई:कुठलीही मोठी गोष्ट डोळ्यासमोर ठेवली तर आमच्यातील वाद खूप किरकोळ आहे. त्यासमोर महाराष्ट्र खूप मोठा आहे. या महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी आणि मराठी माणसाच्या अस्तित्वावासाठी आमच्यातील वाद आणि बाकी सगळ्या गोष्टी क्षुल्लक आहेत. त्यामुळे एकत्र येणं आणि एकत्र राहणं, या गोष्टी कठीण नाहीत, पण प्रश्न फक्त इच्छेचा आहे, असं म्हणत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे अप्रत्यक्षरीत्या युतीसाठी हात पुढे केला आहे. अभिनेते आणि दिग्दर्शक महेश मांजरेकर यांना दिलेल्या एका मुलाखतीत राज यांनी हे वक्तव्य केलं आहे.शिवसेना आणि तुमची पुन्हा युती होऊ शकते का? असा प्रश्न मुलाखतीदरम्यान महेश मांजरेकर यांनी विचारला होता. त्यावर राज ठाकरे म्हणाले की, एकत्र येणं कठीण नाही. आपण महाराष्ट्रासाठी लार्जर पिक्चर पाहणं गरजेचं आहे आणि ते मी पाहतच आहे. माझं तर म्हणणं आहे की, महाराष्ट्रातील सगळ्या राजकीय पक्षातील » पान २ वर

## हिंदीसक्तीचे 'संपर्कसूत्र'

राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकावी लागणार, याचा आनंद झालेला वर्ग बहुधा सध्या एकच असेल, तो म्हणजे यासाठी शिकवणी वर्ग सुरू करून त्यातून मिळू शकणारा आर्थिक लाभ पाहू शकणारा. म्हणजे, राजकीय विरोध, शैक्षणिक क्षेत्रातून उमटणारी तीव्र नापसंती आणि सरकारच्या पातळीवर करावी लागत असलेली सारवासारव हे या विषयावरील एक चर्चाविश्व झाले. त्याच्या पल्याड या निर्णयाशी थेट संबंधित असलेले पालक आणि विद्यार्थी यांच्यासाठी या निर्णयाचे आकलन आणखी एका विषयाचे ओझे यापेक्षा वेगळे नसावे. ते पाहता, शिकवणी वर्ग सुरू करण्याचा विचार मनात आलेल्यांव्यतिरिक्त या निर्णयाने खूश होणारे विरळाच. आता, तसे यात 'एक देश, एक भाषा' या दिशेने जाण्याच्या मार्गावर आम्हीही कसे आहोत, हे दाखवून केंद्राची तळी उचलल्याचे 'गुण' आपल्या प्रगतिपुस्तकात पाडून घेणाऱ्या काही जणांचा समावेशही करावा लागेल, पण ते तसे पुढच्या टप्प्यातील लाभार्थी. सध्या तरी ते, 'आता हिंदीत' असे दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या पत्रकारांनी म्हटल्यावर आपल्या मोडक्यातोडक्या हिंदीत, 'सरकारने ये निर्णय लेकर कोणतीही चूक नही की है' असे सांगण्यात अधिक मशगूल.

तर, नवीन शैक्षणिक धोरणातील (एनईपी) त्रिभाषा सूत्राच्या नावाखाली राज्याने मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांत इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य असेल, असा निर्णय घेऊन झालेला आहे. मराठी आणि इंग्रजी याशिवाय इतर माध्यमांच्या ज्या शाळा राज्यात आहेत, तेथील विद्यार्थ्यांना त्या माध्यमाची भाषा शिकण्याव्यतिरिक्त मराठी आणि इंग्रजी या भाषा शिकाव्याच लागत असल्याने त्यांना हा निर्णय लागू नाही. कारण, ते आत्ताच तीन भाषा शिकत आहेत. आता खरे तर 'एनईपी'मध्ये पहिलीपासून त्रिभाषा सूत्र राबवा, असा काही थेट उल्लेख नाही. तरीही राज्य सरकारला असे काही तरी करावेसे आणि त्यातही हिंदी शिकावेच लागेल, असेच का म्हणावेसे वाटले असावे, या प्रश्नाला काही ठोस उत्तरे अद्याप तरी मिळालेली नाहीत. 'एनईपी'ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात आला. तो करणाऱ्या सुकाणू समितीनेही असे थेट काही सुचवले होते, असे नाही. तिसरी भाषा शिकवायचीच असेल, तर भारतीय भाषांचे पर्याय द्या, असे समितीने म्हटल्याचे समितीचे सदस्य सांगतात. मग फक्त हिंदीच का? सरकारी अधिकाऱ्यांनी याबाबत काही स्पष्टीकरणे दिलेली आहेत, त्यांचा आधी ऊहापोह करून मग त्यावर भाष्य अधिक योग्य.

शिक्षण विभागाचे अगदी प्राथमिक म्हणणे असे, की मुलांना लहान वयात अधिक भाषा शिकता येतात, हे संशोधनामुळे सिद्ध झालेले असल्याने पहिलीपासून तिसरी भाषा शिकविण्यात काही गैर नाही. ती तिसरी भाषा हिंदी अशासाठी, की मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषांसाठी देवनागरी लिपी वापरण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांना अक्षरओळख अधिक सुलभ जाईल. शिवाय, परिसरात, दूरचित्रवाणीवरही हिंदीचा प्रभाव दिसतोच. परिणामी, हिंदी लवकर शिकता येईल. दुसरा मुद्दा अधिकारी मांडतात, तो असा, की सध्याच्या प्रचलित व्यवस्थेत इयत्ता पाचवीपासून हिंदी भाषा आहेच, तर आठवीपासून हिंदी किंवा हिंदी–संस्कृत किंवा फक्त संस्कृत असे पर्याय आहेत. आता फक्त पाचवीऐवजी पहिलीपासून हिंदी शिकवायला सुरुवात होणार असून, याला सक्ती म्हणता येणार नाही. पहिलीपासून हिंदी आणण्याच्या निर्णयाच्या बाजूने आणखी एक युक्तिवाद असाही आहे, की शालेय स्तरावर 'एनईपी' लागू झाल्यावर 'अॅकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स' म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याचे श्रेयांकांचे खाते तयार होईल. विषय शिक्षण हे त्या–त्या इयत्तांतील गुणांपुरते मर्यादित न राहता, श्रेयांकांमध्ये मोजले जाणार असल्याने आणि ते पुढेही ग्राह्य धरले जाणार असल्याने अन्य माध्यमांच्या (ज्या शाळांत त्या माध्यमाची भाषा आणि मराठी आणि इंग्रजी, अशा तीन भाषा आत्ताही शिकवल्या जातात) विद्यार्थ्यांच्या तुलनेत राज्यातील मराठी आणि इंग्रजी माध्यमाची (ज्या शाळांत सध्या पहिलीपासून दोनच भाषा आहेत) मुले पुढे जाऊन मागे पडू नयेत, यासाठी तिसरी भाषा पहिलीपासून समाविष्ट करणे गरजेचेच होते.

या सर्व सरकारी तर्कटाला अगदी पहिले आणि स्वाभाविक उत्तर हे आहे, की विरोध हिंदी भाषेला नाही, तर मराठी भाषिक राज्यात होणाऱ्या त्या भाषेच्या सक्तीला आहे. लहान वयात मूल अधिक भाषा सहज शिकते, असे संशोधन सांगत असले, तरी ते सक्तीने नाही, हे कसे सोयीस्करपणे विसरून चालेल? दुसरे म्हणजे मराठी आणि हिंदीची लिपी सारखी असली, तरी लेखनाचे, शुद्धलेखनाचे नियम भिन्न आहेत. अगदी विभक्ती प्रत्यय जोडून लिहायचे, की स्वतंत्र, यामध्ये फरक आहे. लिपी सारखी आहे, म्हणून एक वेळ अक्षरओळख झाल्यावर अक्षरे वाचता येतील, पण भाषा कशी समजणार? त्यासाठी ती वेळ देऊन शिकावी आणि शिकवावी लागते.

ती योग्य पद्धतीने शिकविण्यासाठी पुरेसे शिक्षक असणे, हा त्यामुळे आणखी एक आनुषंगिक मुद्दा. हिंदी भाषा परिसरात बोलली जाते, दूरचित्रवाणीवर असते, असे म्हणताना केवळ शहरी भागांचा विचार करून कसे चालेल? राज्याच्या सीमांवरील परिसरांत त्या सीमेला लागून असलेल्या राज्यांतील भाषा तेथे अधिक जवळच्या असतील, की हिंदी? म्हणूनच हिंदीबरोबर गुजराती, कन्नड, कोकणी, तेलुगू, उर्दू यापैकी एखादी भाषा शिकण्याचा पर्याय उपलब्ध करून देणे अधिक श्रेयस्कर नाही का? हाच प्रतिवाद 'अॅकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स'च्या मुद्द्यालाही लागू होतोच. श्रेयांक कमी पडू नयेत, म्हणून तिसरी भाषा आणायची असेल, तर भाषानिवडीचे वेगवेगळे पर्याय देऊच शकता येतात, हिंदीची सक्ती कशाला?

# आकाशी झेप घे रे पाखरा



आयुष्यात एकदा तरी देशात भ्रमंती करता आली पाहिजे. किमान आपला देश आपण पाहिला पाहिजे. तो न्याहाळत आला तर आपले भाग्यच म्हणायचे. खर म्हणजे, भ्रमंतीने ज्ञानात भर पडते जाणीवा वाढतात. माणसांच्या भाव–भावनांची पारख होते. चांगल्या गोष्टी लक्ष वेधून घेतात. तिथल्या संस्कृतीची ओळख होते. ज्येष्ठ–श्रेष्ठ पत्रकार आचार्य अत्रे म्हणायचे, पत्रकारांनी फार एका जागी बसून दूर पाहवू नये. होईल तेवढे, जमेल आणि झेपेल तेवढे फिरावे. या अर्थाने, गेवराई जि.बीड येथील पत्रकार ~~बांधवांचा हवाई दौरा लक्षवेधी ठरला. अखिल भारतीय मराठी~~ पत्रकार परिषदेचे, गेवराई जि.बीड येथील पत्रकार संघाचे अध्यक्ष, दै. लोकप्रश्न वृत्तपत्राचे वार्ताहर मधुकर तौर यांच्या संकल्पनेतून दिल्ली दौरा यशस्वी झाला. पत्रकार भवनात दर्पण दिन ६ जाने. साजरा झाला की, कुठेतरी दौरा असतोच असतो. महाराष्ट्रातल्या बहुतांश ठिकाणी पत्रकार फिरून आलेत. मुंबई, कोल्हापूरचा कास पठारचा भाग, गुजरात मधील सरदार पटेलांचा स्टॅच्यू, हैद्राबादची फिल्म सिटी, कोकण पट्टा, गणपती पुळे, गोवा, किल्ले रायगड इ. ठिकाण पाहून झालेत. कौतुकाची गोष्ट म्हणजे, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे, गेवराई संघाचे अध्यक्ष मधुकर तौर सलग एखाद वर्षाचा अपवाद सोडता सतरा वर्षांपासून अध्यक्ष पदावर आहेत. संघातल्या सदस्यांनी एखादी गोष्ट सांगितली तर, ते नाही म्हणत नाहीत. स्वतःच्या खिशाला खात्री लावायला मागे–पुढे पाहत नाहीत. त्यामुळे, त्यांचे नेतृत्व सर्वमान्य राहीले आहे. त्यांच्यात दानत आहे. ज्येष्ठांच्या मागणीला त्यांचा होकारच असतो. मला वाटत, किमान बीड जिल्ह्यातील पत्रकारांच्या भ्रमंतीचा लेखाजोखा पाहिला तर गेवराई च्या पत्रकारांचा नंबर पहिलाच येईल. या अथाने, मधुकर तौर यांचे नेतृत्व उजवे ठरते. दिल्ली सफरीचे श्रेय त्यांनाच द्यावे लागेल. जुनेद भाई, ड. हारून भाई , सुशील टकले, प्रसाद कुलकर्णी, इरशाद भाई सारखी तरूण मंडळी ज्येष्ठ पत्रकारांच्या सदैव पाठिशी राहीली आहे.

कुलगुरू शिवाजीराव भोसले यांनी सांगितलय, मुंबई, दिल्ली इहलोकीचा स्वर्ग आहे. अनेकांना अशा मोठ्या आणि चांगल्या अर्थाने झगमगाट असलेल्या शहरांचे आकर्षण असते. गेवराई च्या पत्रकारांनी चार दिवस दिल्लीची सफर केली. चांगला फेरफटका मारला. दिल्लीतल्या राष्ट्रीय प्रतिकांच्या स्मृती डोळ्यात साठवून पत्रकारांची टीम पाचव्या दिवशी स्वगृही पोहचली.

खर तर, गेल्या वर्षीच दिल्ली दौरा ठरलेला होता. ग्रुपवर चर्चा झाली होती. मात्र, गणित जुळले नाही. या वर्षी सगळ्यांनीच मनावर घेतले. चलो दिल्ली..! अखेर एकदाचे ठरले. तारीख, वेळ, निश्चित झाली.

१० एप्रिल २०२५ रोजी पहाटे निघायचे. तशी, सूचना देण्यात आली होती. सकाळी सात वाजता संभाजीनगर औरंगाबाद विमानतळावरून उड्डाण होणार होते. ज्येष्ठ पत्रकार अय्युब बागवान यांच्या दोन गाड्या सज्ज होत्या. त्यांनीच व्यवस्था करून ठेवली होती. विमानतळावर एक तास आधीच पोहचणे आवश्यक असते. तसा, नियम असतो. बरोबर वेळेत दहा जणांचा चमू संभाजीनगरच्या दिशेने निघाला. हवाई अड्ड्यावर पत्रकार वेळेत पोहचले. जवळपास आठ पत्रकार पहिल्यांदाच विमानात बसण्याचा अनुभव घेणार होते. आनंददायक क्षण अनुभवायला मिळणार होता. मन कावरं–बावरं झालं होतं. जिवाची ममई मुंबई करायची हौस म्हणून त्या क्षणाचा वेगळा फिल येत होताच. इरशाद भाई सारखा एक नवखा, तरूण पत्रकार आनंदाने हरखून गेला होता. बहुतेकांची अशीच भावना होती. अमुक पुढारी,नेता, उद्योजक विमानतळावर आल्याची बातमी लिहिणे, आणि स्वतः हवाई अड्ड्यावर उपस्थित राहाणे, या दोन गोष्टींतला फरक लक्षात येतोच. एक रुखरुख मात्र राहीली. लोकमत चे वार्ताहर सखारामजी शिंदे यांच्या मुलाचा नीटचा पेपर, आणि भाच्याचं लग्न ठरल्याने, त्यांना दिल्ली दौरा ऐनवेळी रद्द करावा लागला.

सकाळी, बरोबर सात वाजता संभाजीनगर विमानतळावरून विमानाने मुंबईच्या दिशेने झेप घेतली. पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर , ज्येष्ठ पत्रकार अय्युब बागवान भाई , दिनकर शिंदे, गणेश क्षीरसागर, जुनेद बागवान, ड. हारून शेख, सुशील टकले, गजानन चौकटे , प्रसाद कुलकर्णी आणि

शेख इरशाद भाई इ. पत्रकारांना घेऊन विमान आकाशात झेपावलं. संभाजीनगर ते मुंबई, आणि मुंबई ते दिल्ली असा प्रवास होता. मुंबई हून विमान बदलावं लागणार होतं. अर्धा, पाऊणतासात महाराष्ट्राची राजधानी मुंबई विमानतळावर विमानाचे पाय टेकले.

काही क्षणातच पत्रकारांच्या हवाई सफरीची बातमी सोशल नेटवर्किंग साईटवर झळकली. फेसबुक, वॉट्सअप वर फोटो आले. हवाई सफरीवरची टीम फादर बॉडी असल्याने, शुभेच्छांचा प्रचंड वर्षाव सुरू झाला. हॅपी जर्नी चे संदेश दिले गेले. ठीक दुपारी दीड वाजता मुंबई येथून निघालेले विमान दिल्लीच्या दिशेने निघाले होते. आधीचा प्रवास थोडा कमी उंचीवरून होता. आजुबाजुचा परीसर स्पष्ट दिसत होता. हिरवीगार शेती दिसली. नदी, नाले, रस्ते दिसले. मुंबईतल्या उंचच उंच , गगनचुंबी इमारती दिसल्या, असंख्य घरे काड्याच्या पेटी समान दिसत होते. आशिया खंडातील झोपडपट्टी पाहून विंडो सीटवर बसलेल्या पत्रकारांना नवल वाटले. एवढ्या दाटीवाटी मध्ये कशी राहत असतील ही माणसे ? असा प्रश्न मनाला स्पर्शून गेला.महाराष्ट्र सदनात पाच दिवस राहता आले. हे सदन मराठी माणसाचे हक्काचे अलिशान घरच आहे. मराठी माणसाच्या स्वागतासाठी सदन नटलेले असते. सदनातले आल्हाददायक वातावरण, तिथल्या कर्मचाऱ्यांचा रिस्पेक्ट,

मराठमोळं जेवण, सारेच कसे अफलातून होतं.

महाराष्ट्र सदनासाठी खा. रजनीताई पाटील, खा.बजरंग सोनवणे, मंत्री महोदया पंकजा मुंडे, खा. निलेश लंके,अधिस्वीकृती धारक ज्येष्ठ पत्रकार शिवाजी मामा ढाकणे यांचे सहकार्य मिळाले. खा. लंके यांना एकाच दिवशी, केवळ अर्धा तासात १३ वेळा फोन केले. त्यांनी सगळ्या फोनला सकारात्मक प्रतिसाद देऊन, पत्रकारांचे कौतुक केले. हरहुन्नरी कलाकार, युवा पत्रकार सुशिल टकले यांनी हा सुखद अनुभव सांगताना, त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त केली. युवा पत्रकार जुनेद भाई, ड. हारून शेख यांनी ही खूप धडपड केली. राष्ट्रपती भवनात प्रवेश करण्याचे सर्व सोपस्कार पार पाडले. दोघे ही खूप चंचल आहेत. त्याचा फायदा सर्वच टीमला झाला.पाच दिवस कसे, भुरकून निघून गेले. या पाच दिवसात दिल्लीतला लाल किल्ला, इंडिया गेट, राष्ट्रपती भवन, जामा मस्जिद, भव्य संसद भवन, ताजमहाल, बिर्ला मंदिर, हुमायू गार्डन, राजपथ, लोट्स टेंम्पल, मथरूतील श्री कृष्ण जन्म भूमी, व्दारकेतले प्रेम मंदीर पाहता आले. राष्ट्रीय प्रतिकांच्या दर्शनाने पारतंत्र्यातले दिवस आठवले. त्या माणसांची याद आली. ज्यांनी देशासाठी बलिदान दिले. ज्यामुळे नवी पहाट , तेजोमय सूर्योदय पाहता आला. स्वातंत्र्यानंतरचा भव्य– दिव्य हिंदुस्तान , तो डौलाने फडकलेला तिरंगा , संसद भवनाची देखणी इमारत, नव्हे लोकशाहीचे मंदिर, इंडिया गेट वर दिमाखात फडकत असलेला जान से प्यारा तिरंगा..! हे सगळे पाहिले की, जाती–भेदाची सगळी जळमटे मनःपटलावरून नाहिशी होतात. एकच गीत आठवते. बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो..!

लेखक
सुभाष सुतार, पत्रकार, गेवराई बीड

## पान एक वरून

**महिला सरपंचाला**

नाही. ग्रामसेवक या मनमानी कारभार चालवत आहेत. गावातील सुरू असलेला . शुद्ध पाण्याच्या प्लांट चे पैसे कुणाच्या खात्यात जमा होतात याची देखील कल्पना विद्यमान सरपंचांना नाही. गावात सुरू असलेला ग्रामसेवकांचा मनमानी कारभार थांबवा यासाठी सरपंच पार्वतीबाई पौळ यांनी पंचायत समिती अंबाजोगाई गटविकास अधिकारी यांना तीन वेळा तक्रार देऊनही दखल घेतली नाही. अंबाजोगाईच्या गटविकास अधिकारी दिवाने मॅडम यांना तक्रारी देऊन वेळोवेळी भेटून देखील धानोरा खुर्द गावच्या सरपंच पार्वतीबाई पौळ यांना न्याय दिला नाही. गटविकास अधिकारी न्याय देत नसल्यामुळे सरपंच पार्वतीबाई पौळ यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना देखील मार्च महिन्यात निवेदन देऊन न्याय देण्याची मागणी त्यांनी केली आहे. त्यांच्या निवेदनामध्ये सरपंच यांनी अशी मागणी केली आहे की गेल्या अडीच वर्षात राबवण्यात आलेल्या अनेक योजना झालेले विकास कामे माझ्या परस्पर झाले असून हे गावात किती विकास कामे झाले ते दर्जेदार झाले का नाही गावात किती निधी आला कुठे कुठे खर्च केला. याबाबत मला ग्रामसेवक यांनी कसलीही माहिती दिली नाही. पाठीमागे झालेले कामे आणि सध्या सुरू असलेल्या कामाबाबत मला कसलीही कल्पना नाही. माझ्या परस्पर ग्रामसेवक कारभार पाहतात. यामध्ये काही भ्रष्टाचार झाल्यास माझा कसलाही संबंध राहणार नाही याची दखल जिल्हा प्रशासनाने घ्यावी अशी मागणी धानोरा गावच्या सरपंच पार्वतीबाई पोळ यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्याकडे केलेली आहे. या महिला सरपंचांना बीड जिल्हा परिषदेचे सिओ न्याय देतील का असा प्रश्न गावातील सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

**रिक्त पोलीस पाटील भरतीचे**

सुशिक्षीत बेरोजगारांना या नौकरीतून रोजगार उपलब्ध होईल. तसेच कायदा व सुव्यवस्था पाहता पोलिस पाटलांची रिक्त पदे भरणे आवश्यक होते. या पदांची त्वरित भरती करण्याची मागणी भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती. या निवेदनाची मंत्री महोदयांनी त्वरित दखल घेऊन जिल्हाधिका–यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या अनुषंगाने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी बीड, माजलगाव, पाटोदा, अंबाजोगाई, परळी उपविभागीय अधिका–यांना भरती बाबतचे निर्देश देऊन भरतीचे वेळापत्रक दिले, दि.२ मे, पासुन अर्ज स्वीकारण्यात सुरवात होणार असून, दि. १९ मे, पर्यंत अर्ज स्वीकारले जातील व दि.२० जूनला लेखी परिक्षा होईल व दि.४ जुलै रोजी तोंडी मुलाखती होऊन नियुक्ती देण्यात येईल. वर्षानुवर्षे पोलिस पाटील भरतीचा रखडलेला प्रश्न अखेर शंकर देशमुख प्रयत्नामुळे अखेर मार्गी लागला, म्हणावा लागेल.

**रणजित कासले विरोधात**

गंभीर गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास परळी शहर पोलिस करत आहेत. दरम्यान रणजित कासले याने अटक होण्यापूर्वी निवडणूक आयोगाला आव्हान देणारे काही बेजबाबदार वक्तव्ये केली होती, त्यावरून आयोगाने बीड जिल्हा प्रशासनाकडून याबाबतचा अहवाल मागवला असल्याचे समजते. बीड जिल्हा प्रशासनाने निवडणूक आयोगास रणजित कासले याने केलेल्या वक्तव्याबाबत गुप्त अहवाल सादर केला असून, रणजित कासले याला निवडणुकीत काळात बीड सायबर विभागात नेमणूक दिलेली होती, त्याची ड्युटी परळी विधानसभा मतदारसंघात नव्हती त्यामुळे त्याचा निवडणूक प्रक्रियेत काहीही संबंध नव्हता, असा अहवाल सादर केला असल्याचे खात्रीलायक सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार समजले आहे. तर दुसरीकडे रणजित कासले ज्या दहा लाख रुपयांची गोष्ट सांगत हे सगळे आरोप करत होता, ते दहा लाख रुपये अंबाजोगाई येथील संत बाळूमामा कन्स्ट्रक्शन चे संचालक सुदर्शन काळे यांच्या कडून कासले याने मागून घेतले होते तसेच त्यातून साडे सात लाख रुपये आतापर्यंत काळे यांना परत दिले असून आणखी उरलेले अडीच लाख रुपये परत द्यावेत यासाठी सुदर्शन काळे यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात तक्रार दिल्याचे समोर आले आहे. त्यामुळे स्वतःच नशेत वक्तव्ये करतो असे विधान करणाऱ्या रणजित कासले याने केलेली वक्तव्ये निराधार खोटी आणि केवळ सनसनाटी निर्माण करायच्या उद्देशाने केलेले होते हे आता स्पष्ट झाले आहे.

**बराक ओबामा घेणार**

स्वत: ला असे काहीतरी करताना पाहायचे जे मी करायला हवे होते. तुम्हाला माहित आहे आणि मी ठरवले की माझ्यासाठी जे चांगले आहे ते करायचे आहे.

**मिशेल ओबामांनी पुस्तकात केले मोठे खुलासे**: माजी फर्स्ट लेडीने आपल्या 'द लाइट वी कॅरी' या पुस्तकात खुलासा केला आहे की, बराक ओबामा यांना भेटण्यापूर्वी त्यांनी अशा पुरुषांना डेट केले होते ज्यांना स्वतःबद्दल कमी आत्मविश्वास होता आणि त्यांना काय हवे आहे हे देखील माहित नव्हते. त्या माणसांमध्ये एक–दोन खेळाडू होते जे बघायला छान आणि सोबत राहायला उत्कंठावर्धक होते, पण जे अनेकदा माझ्या खांद्यावर बघत होते, माझ्या हृदयात काय चालले आहे ते पाहण्याचा प्रयत्न करत होते. भविष्यातील नातेसंबंधांचाही ते विचार करत होते.

**बराक–मिशेलमध्ये घटस्फोटाची अफवा?** : 'त्यावेळी आपली काही वेळा फसवणूक झाली होती आणि बराक ओबामा आपल्याला काय हवे होते याबद्दल थेट आणि स्पष्ट असले तरी त्यांच्या सुरुवातीच्या प्रेमाने त्यांच्याशी खोटे बोलले होते, असे त्या म्हणाल्या. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांच्या अंत्ययात्रेत बराक ओबामा एकटेच सहभागी झाले होते, तेव्हा हे दोघे घटस्फोट घेणार असल्याच्या अफवा पसरू लागल्या होत्या. त्यानंतर लगेचच मिशेल ओबामा यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहणार नसल्याचे जाहीर केले. यामुळे अफवांना उधाण आले.

**अन्न पदार्थांतले भेसळ ओळखण्याचे**

संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा हे नेहमीच प्रयत्न करत असतात. त्याचाच एक भाग म्हणून अन्न व औषध प्रशासन कार्यशाळा छ. संभाजीनगर अन्न व औषध प्रशासन बीड आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालय बीड यांच्याद्वारे अन्नपदार्थ मधील भेसळ कशी ओळखायची यांची जनजागृती मोहीम आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचे आयोजन आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयात करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून छत्रपती संभाजी नगरचे सतीश बादाडे, बीडचे पवन कुमार धूत, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य शाम भुतडा तर व्यासपीठावर डॉ. कल्याण अपेट, डॉ. पी. डी. खेडकर, डॉ. डी. बी. सातपुते, डॉ. एन. यु. ठोके, प्रा. पी.आर. गव्हाणे,प्रा. व्ही. एस. मिसाळ, प्रा. के.पी. पवार, प्रा. ए.पी. धुमाळ, प्रा. एस. आर. सुधीर, प्रा. पी. एस. मोराळे यांची उपस्थिती होती. प्राचार्य शाम भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्याण अपेट यांनी केले.

**ठाकरे बंधू एकत्र**

सर्व मराठी नेत्यांनी एकत्र येऊन एकच पक्ष काढावा, अशी भावना राज यांनी व्यक्त केली. तसंच महाराष्ट्राच्या भल्यासाठी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसोबत युती करण्यास मला अडचण नसल्याचं त्यांनी सुचवलं आहे.मुलाखतीत राज ठाकरे पुढे म्हणाले की, शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर माझा विचार होता की आपण बाळासाहेब सोडून कोणाच्या हाताखाली काम करायचं नाही. पण शिवसेनेत असताना मला उद्धवसोबत काम करायला काही प्रॉब्लेम नव्हता. मात्र मी त्यांच्याबरोबर काम करावं, अशी समोरच्याची इच्छा आहे का? असा सवाल राज ठाकरेंनी विचारला. त्यावर महेश मांजरेकरांनी महाराष्ट्राची तशी इच्छा आहे असं म्हटलं. मांजेकर यांच्या या टिपण्णीवर भाष्य करत आमची युती व्हावी, अशी महाराष्ट्राची इच्छा असेल तर महाराष्ट्राने त्यांना (उद्धव ठाकरेंना) जाऊन सांगावं तसं. छोट्या–छोट्या गोष्टींमध्ये मी माझा इगो कधी मध्ये आणत नाही, आणला पण नाही, असं म्हणत राज यांनी उद्धव ठाकरेंना युतीसाठी टाळी दिली आहे. दरम्यान, राज ठाकरे यांच्याकडून पुन्हा एकदा राजकीय युतीसाठी हात पुढे करण्यात आल्याने उद्धव ठाकरे यावर कसा प्रतिसाद देतात, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

**असंख्य तरुणांचा शिवसेनेत**

दादा गायकवाड यांनी प्रत्येकाच्या हाती भगवा झेंडा देऊन सर्वांचे शिवसेनेत स्वागत केले. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते बाळासाहेबांच्या विचारांचा रथ यशस्वीपणे ओढत असून त्यांनी आपल्या मुख्यमंत्री काळात सामान्य जनतेसाठी अनेक हितदायी योजनांची उभारणी करत स्वतःला सिद्ध केले आहे. सर्वसामान्यांसाठी त्यांनी अनेक हितदायी योजना उभारल्या. बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार असणारे आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांची ताकद वाढवण्याकरिता आपण सर्व जाती–धर्मातील कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे अशा भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात मांडल्या तर अठरा पगड जातीची वज्रमुठ एकनाजी शिंदे साहेबांची ताकद वाढविण्यासाठी कामी येणार असल्याचे मत शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटकदगडू दादा गायकवाड यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शिवसेना, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान सहा वरून

**श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड**

विकासासाठी मुख्यमंत्री महोदय आपल्यासोबत आहेत, सत्तेशिवाय विकास होवू शकत नाही, त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी हा गड दत्तक घ्यावा. गड दत्तक घेणे म्हणजे इथे येणाऱ्या प्रत्येकाचा विकास करणे आहे, त्यामुळे येत्या काळात जिल्हा सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही.

**शॉर्टसर्किटमुळे गोठा**

आगीची कल्पना देत शेतकऱ्याशी फोनवरून बोलणे करून दिले. संबंधित प्रकरणात पंचनामा करण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी यांना सुचना देतो असे तहसीलदार शेळके म्हणाले.

**सीमा ओस्तवाल यांचे**

सेविका म्हणून आपल्या कार्यामुळे ओस्तवाल सर्व परिचित आहेत. त्यांच्या या सामाजिक शैक्षणिक कार्याचा सन्मान व्हावा म्हणून जयंती उत्सव समिती तर्फे सीमा ओस्तवाल यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उप शिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे, अरुणाताई आठवले, सुशीलाताई मोराळे, सुमेध जोगदंड, शैलजा चिलवंत, माया चोपडे, माया दिवाण आदींची उपस्थिती होती.

**कन्हेरवाडी जयभीम**

सोहळा पार पाडण्यासाठी जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष अक्षय सावंत,उपाध्यक्ष धनंजय खंडागळे व सर्व पदाधिकारी यांनी सर्व जबाबदाऱ्या पार पाडून हा कार्यक्रम पार पाडल्या बद्दल समस्त कन्हेरवाडी ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले तसेच प्रताप सावंत यांनी नाश्त्याची व पाण्याची सोय केली होती.यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने जी.प.प्रा. शाळा कन्हेरवाडी शाळेत काही स्पर्धा घेण्यात आल्या होत्या या स्पर्धाकांना बक्षीस वाटप करण्यात आले तर सूत्रसंचालन माजी सरपंच वसुदेव सावंत, राजेंद्र देविदास सावंत तर आभार आनंद सरवदे सर यांनी यांनी मानले यावेळी २७/४/२०२५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे.असे आव्हान जयंती कमिटीतर्फे करण्यात आलेले आहे.

**पाटोदामध्ये पत्रकार संघाची**

मकरानी, प्रा. सचिन पवार, तालुकाध्यक्ष अजय जोशी, डिजिटल मीडिया अध्यक्ष गोकुळ इंगोले, हमीद खान पठाण, इद्रिस चाऊस, दयानंद सोनवणे, अनिल गायकवाड, जावेद शेख, नानासाहेब डीडुळ, सज्जाद सय्यद, दत्ता देशमाने, प्रदीप उबाळे, सचिन शिंदे, पवनकुमार भोकरे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वसामान्यांचा आवाज बनण्याची जबाबदारी आमची – मराठी पत्रकार परिषद पाटोदा तालुक्यातील मराठी पत्रकार परिषदेचे सर्व सदस्य एकवटून, सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी लढण्याचा आणि अन्यायाविरोधात ठामपणे उभे राहण्याचा निर्धार या बैठकीत केला गेला. पत्रकार परिषदेचा हा उपक्रम तालुक्यात लोकशाहीचा बळकटीकरण करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

**केजमध्ये केविसंसचे धरणे**

व्हावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी केले आहे.या निवेदनावर समन्वयक हनुमंत भोसले, शेषराव घोरपडे, नासेर मुंडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रती महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक, आमदार नमिता ताई मुंदडा, उप महाव्यवस्थापक संभाजीनगर, विभागीय नियंत्रक बीड, आगार प्रमुख किल्लेधारूर यांना पाठवण्यात आलेल्या आहेत.

**खामसवाडी येथे सत्कार**

अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे,विशाल शेळके, बँकेचे कर्मचारी सचिन पांचाळ, वसुदेव पाचंगे, ज्ञानेश्वर जाधव, बिभिषण पवार, उद्धव शेळके यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

**स्वस्त धान्य दुकानदाराची**

जनतेला त्यांच्या हक्कांच्या राशन पासून वंचित ठेवत असल्याचा प्रकार दिसून येत आहे.राशन दुकानदाराचा मनमानी कारभार सुरू असून, पुरवठा विभाग कुठलीही ठोस कारवाई करायला तयार नाही.राशनकार्डधारकांना धान्य घेणे सोईचे होण्यासाठी सरकार मान्य स्वस्त धान्य दुकाने दररोज सकाळी सात ते दुपारीएक आणि दुपारी दोन ते रात्री त्या दिवशीचे लाभार्थ्यांना धान्य वाटप संपेपर्यंत उघडे राहतील,असा नियम आहे. राशन घेण्यासाठी आलेल्या वयोवृद्ध रेशन दुकानदार कधी येऊन दुकान उघडेल आणि आपल्याला राशन मिळेल,याची वाट पाहत असतात. राशन दुकान वेळेत उघडणे अनिवार्य आहे. राशन घ्यायला आल्यानंतर दुकान बंद असते. कामावर खाडे करून राशन घ्यायला यावे लागते.राशन दुकान बंद असल्याने राशन मिळत नाही आणि कामाचे सुद्धा खाडे होते. त्यामुळे दोन्हीकडून नुकसान होत असल्याचे एका पुरुष लाभार्थ्याने सांगितले आहे.

**जल व्यवस्थापनसाठी ;जलसंपदा**

रविंद्र निकाळजे,महसुल मंडळ अधिकारी,कृषी सहाय्यक स्नेहल भोसले,ज्येष्ठ नागरिक बलभीम खाडे, सरपंच सुरेश सातपुते,लालासाहेब वीर,रघुनाथ शिंदे, यांच्यासह आजी–माजी ग्रामपंचायत सदस्य सोसायटीचे चेअरमन व वाळुज येथील सर्व शेतकरी बांधव कार्यक्रमासाठी उपस्थित होते.पुढे बोलतांना पाखरे म्हणाले,येथुन पुढे शेतीसाठी पाणि हे ठिबकद्वारे च द्यावे जेणे करुन पाणि पिकाला लागेल तेवढे मिळेल व पाण्याची नासाडी न होता मोठ्या प्रमाणावर बचत होईल.यावेळी लालासाहेब वीर म्हणाले, पाण्याविषयी बचत पाण्याविषयी चे महत्व पाणी हे एक जीवन आहे.पाणी भविष्यासाठी किती आवश्यक आहे या बाबीविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषी सहाय्यक स्नेहल भोसले ह्या म्हणाल्या,शेतीला आधुनिक पद्धतीने पाणी देण्यासाठी तुषार सिंचन ठिबक सिंचन या पद्धतीचा वापर करावा आणि जास्तीत जास्त पाणी बचत करावी असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बबन झगडे यांनी तर रघुनाथ शिंदे यांनी मानले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# ‘बेस्ट’ वाचवण्यासाठी मा.खा. नारायण राणेंचा पुढाकार

मुंबईची जीवनवाहिनी रेल्वेला संबोधले जात असले तरी रेल्वेखालोखाल बेस्ट उपक्रमाच्या बसेसना जीवनवाहिनीचा मान दिला जातो. मुंबईतील लाखो प्रवासीसंख्या पाहता रेल्वे एकाच वेळी काही हजार लोकांना घेऊन प्रवास करत असते. त्या तुलनेत बेस्टच्या बसला दोन आकडी अक्षरी संख्येतच प्रवासी सुविधा देणे शक्य होते; परंतु रेल्वे सेवा ज्या ठिकाणी रूळ आहेत व ज्या ठिकाणी स्टेशन आहेत त्याच ठिकाणी प्रवाशांची ने-आण करू शकते. बेस्टच्या बसचे तसे नाही. मुंबई शहर, मुंबईची उपनगरे, ठाण्याच्या वेशीपर्यंत, भाईंदर, नवी मुंबई शहराच्या कानाकोपऱ्यातही बेस्टच्या बसेस प्रवासी सुविधा उपलब्ध करून देत आहेत. मुंबईकरांसह ठाणेकर, भाईंदरवासीय, नवी मुंबईकरांना बेस्टमुळे प्रवासी सुविधा उपलब्ध होत आहेत. अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तुलनेत बेस्टची प्रवासी सुविधा तुलनेने स्वस्त आहे. प्रवासी सुविधेबाबत सधन असलेल्या बेस्टची आजची आर्थिक अवस्था हालाखीची झाली आहे. एकेकाळी श्रीमंत म्हणून गणल्या जाणाऱ्या बेस्ट उपक्रमाला आज अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागत आहे. कर्मचाऱ्यांना वेतन देण्यासाठी बेस्टला आज महापालिकेच्या मदतीचा आधार घेण्याची वेळ लागलेली आहे. बेस्टला लागलेली घरघर पाहता वेळीच मदतीसाठी राज्य सरकारने व मुंबई महापालिकेने पावले न उचलल्यास बसच्या अस्तित्वावर कायमचे प्रश्नचिन्ह लागण्याची गरज आहे. बेस्टला घरघर लागण्याची वेळ ही केवळ स्वस्त दरात आजही देत असलेल्या प्रवासी सुविधेमुळेच आली आहे. महागाईचा आलेख एकीकडे उंचावत असताना रिक्षा, टॅक्सी व अन्य खासगी प्रवासी सुविधाही महागत असताना बेस्टने मात्र महागाईच्या काळात स्वस्ताईचे धोरण अंगिकारल्यामुळेच बेस्टला तोटा सहन करण्याची आज वेळ आली आहे. बेस्टला आज तब्बल अडीच ते तीन हजार कोटींच्या मदतीची गरज आहे. प्रवाशांचा प्रवासी सुविधेबाबत आजही बेस्टच्या बसवरच विश्वास आहे. मुसळधार पावसामध्ये रेल्वेसेवा एकवेळ विस्कळीत होत असते, पण बेस्टच्या प्रवासी सुविधेमध्ये कधीही खंड पडला नाही. भाईंदर, ठाणे (मुलुंड चेकनाका), नवी मुंबई, मुंबई शहर, मुंबई उपनगर कोठेही प्रवास करावयाचा झाल्यास भल्या पहाटेपासून ते रात्री उशिरापर्यंत बेस्टच्या बस आपल्या सुविधेसाठी रस्त्यावर धावताना पाहावयास मिळतात. कितीही खासगी प्रवासी सुविधा निर्माण झाल्या तरी बेस्टला कोणीही सक्षम पर्याय निर्माण होऊ शकत नाही. साधे कुर्ला-सायन रेल्वे स्टेशनवरून बांद्रा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे यावयाचे झाल्यास रिक्षा टॅक्सीकडून ८० ते १०० रुपये प्रवाशांकडून आकारण्यात येतात. बेस्टची बस मात्रआजही अवघ्या ५-१० रुपयांमध्ये प्रवाशांना सुविधा देत आहे. बांद्रा ते नेरूळ प्रवास करावयाचा झाल्यास रिक्षा व टॅक्सी ३५० ते ५०० रुपयांपर्यंत दर आकारतात, बेस्टची बस मात्र अवघ्या २० रुपयांमध्ये आजही प्रवासी सुविधा देत आहे. त्यामुळे बेस्टच्या बसेसला हातभार देण्यासाठी सर्वपक्षीय राजकारण्यांनी एकत्रित येणे आवश्यक आहे. राज्य सरकार वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून देत असताना राज्य सरकारने आज बेस्टच्या परिस्थितीबाबत विचारमंथन करणे काळाची गरज आहे. एकेकाळी ३५००हून अधिक असणाऱ्या बसेसच्या संख्येचा आकडा आज अवघ्या ८००च्या आसपास येऊन ठेपला आहे. बेस्टची प्रवासी संख्या मात्र ३५ लाखाच्या दरम्यान आहे.

बेस्टला प्रवासी सुविधेसाठी कंत्राटी तत्त्वावर बसेस व कर्मचारी संख्या घेण्याची वेळ आलेली आहे. बेस्टबाबत सर्वचजण उदासिनता दाखवित असताना राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री व खासदार नारायण राणे यांनी बेस्ट उपक्रमाच्या समस्या जाणून घेण्यास स्वारस्य दाखविल्याने बेस्ट कर्मचाऱ्यांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला आहे. नारायण राणे हे भाजपाचे मातब्बर नेते. त्यांनी देशाच्या केंद्रीय पातळीवरील राजकारणात मंत्रीपदाची धुरा सांभाळण्याबरोबरच राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची कमानही काही काळ सांभाळलेली आहे. ‘घार उडते आकाशी, चित्त तिचे पिलांपाशी’ असे म्हणतात, ते काही खोटे नाही. नारायण राणे व बेस्ट उपक्रमाचे नाते एक भावनिक आहे. नारायण राणे यांनी सुरुवातीच्या काळात समाजकारणाच्या माध्यमातून राजकारणाचा श्रीगणेशा करताना बेस्ट कमिटीच्या चेअरमनपदाची धुरा सक्षमपणे सांभाळली होती. बेस्ट उपक्रमाबाबत त्यांना विशेष प्रेम आहे. त्यामुळे बेस्ट उपक्रमाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी व बेस्टच्या कर्मचाऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकाराची सर्वत्र चर्चा होत आहे. बेस्टचा डबघाईपणा, वाढता तोटा, बेस्टच्या बसची घटती संख्या, बेस्ट कर्मचाऱ्यांच्या समस्या व त्यांना भेडसावणाऱ्या असुविधा याबाबत सर्वच राजकीय नेत्यांना जाणीव असतानाही कोणीही त्याबाबत स्वारस्य दाखविले नाही, पण नारायण राणे यांनी पुढाकार घेतला. कारण नारायण राणे यांचे बेस्ट उपक्रमावर प्रेम आहे, त्यांना बेस्टबाबत जिव्हाळा व आस्था आहे. त्यांनी तो कृतीतूनही दाखविला आहे. बेस्ट कर्मचाऱ्यांच्या व उपक्रमाच्या समस्यांबाबत त्यांनी बेस्ट भवनच्या मुख्यालयात जाऊन बेस्टच्या महाव्यवस्थापकांशी चर्चा केली. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच वित्तमंत्री अजित पवार यांच्याशी एकत्रित भेट घेऊन बेस्टच्या समस्यांवर तोडगा काढण्याचे व बेस्टला वाचविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही नारायण राणे यांनी बेस्ट कर्मचाऱ्यांना दिलेली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात जमिनीवर पाय ठेवून वावरणारे व जनसामान्यांशी समरस होणारे फारच कमी नेतेमंडळी आहेत, त्यामध्ये नारायण राणे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. आजवर बेस्टकडे कोणी गांभीर्याने पाहत नसल्याने आपल्या उपक्रमाला व आपल्याला कोणी वालीच उरला नसल्याची हताश प्रतिक्रिया बेस्टच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत होती. पण नारायण राणे यांच्या भेटीमुळे बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांमध्ये पुन्हा एक नवा आशावाद निर्माण झाला आहे. बेस्ट वाचविण्यासाठी सर्वपक्षीय राजकीय घटकांनी राजकीय मतभेद विसरून एकत्र येणे काळाची गरज आहे, तरच बेस्टला जगविणे शक्य होणार आहे. नारायण राणे यांनी आता पुढाकार घेतला आहे, त्यांना सर्वांनी बेस्ट उपक्रमासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे. बेस्टची सेवा मुंबईकरांसाठी आवश्यक आहे. बेस्टची सेवा इतिहासजमा झाल्यास मुंबईकरांना खासगी प्रवासी सेवा परवडणारी नाही. मुंबईकरांच्या खिशाला मोठी झळ बसणार आहे. बेस्ट उपक्रमाची आज एसटीच्या दिशेने वाटचाल सुरू झालेली आहे. हा धोका दूरदृष्टी असणाऱ्या नारायण राणे यांनी वेळीच ओळखून त्यांनी पुढाकार घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एक अभ्यासू नेतृत्व आहे. त्यांनीही बेस्टची सध्याची अवस्था पाहून बेस्टला सहकार्य करण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद देणे आवश्यक आहे.

# ड्रोन कॅमेऱ्याने सुसज्ज दीदी



रियास बाबू टी
केंद्रीय संचार ब्युरो, पणजी



नोव्हेंबर २०२३ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत महिलांच्या स्वयं-साहाय्यता गटांना ड्रोन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ‘नमो ड्रोन दीदी’ योजना सुरू केली. आपल्या प्रारंभापासूनच या योजनेने ड्रोनच्या माध्यमातून आकाशात झेप घेत ग्रामीण भागाच्या सक्षमीकरणाची एक नवी परिवर्तनकारी गाथा रचण्यास सुरुवात केली असल्याचे निश्चितच म्हणता येईल. नोव्हेंबर २०२४ मध्ये या योजनेला मान्यता मिळाली होती आणि त्यासोबतच यासाठी १२६१ कोटी रुपयांचीही तरतूद केली गेली होती. त्यानंतर या योजनेने ग्रामीण भारताच्या अवकाशातल्या महिलांच्या भूमिकेला नव्याने आकार द्यायला सुरुवात केली. आपल्या समोर होत असलेल्या या बदलांच्या केंद्रस्थानी आणखी एक उपक्रम आहे तो म्हणजे ‘इंडिया : अ बर्ड्स आय व्ह्यू’ ही अभिनव आव्हानात्मक स्पर्धा. मुंबईत येत्या १ ते ४ मे २०२५ या कालावधीत होणार असलेल्या पहिल्या वहिल्या जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषदअंतर्गत (World Audio Visual & Entertainment Summit - WAVES) राबवल्या जात असलेल्या क्रिएट इन इंडिया या स्पर्धात्मक उपक्रमाचा भाग म्हणून ही स्पर्धा आयोजित केली गेली आहे. या आगळ्या वेगळ्या स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागातल्या या सर्व महिलांना ड्रोनच्या सोबतीने त्यांची सुरू असलेली वाटचाल जगासमोर मांडण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. यामुळे अवघ्या जगाद्वारे त्यांची दखल तर घेतली जाईलच, पण त्यासोबतच भारताच्या वाढत्या तंत्रज्ञान विषयक वाटचालीतही त्यांचा समावेश होणार आहे.

**नमो ड्रोन दीदी : तंत्रज्ञानाला तळागाळापर्यंत पोहोचवणारी योजना**

नमो ड्रोन दीदी योजना एक वेगळी आणि धाडसी पण एका निश्चित उद्देशाने आखलेली योजना आहे. या योजनेअंतर्गत महिला स्वयं-सहाय्यता गटातील सदस्यांना शेतकऱ्यांसाठी ड्रोन सेवा पुरवठादार बनवण्याच्या उद्देशाने २०२४ ते २०२६ या काळात १४,५०० महिला स्वयं-साहाय्यता गटांना कृषी विषयक कामांसाठीचे ड्रोन वितरीत केले गेले, आणि त्यासंबंधीचे सर्वंकष प्रशिक्षणही त्यांना दिले गेले.

पण त्यांना पुरवलेली उपकरणे म्हणजे काही फक्त ड्रोन नाहीत. कारण केंद्र सरकारने कृषी कामांकरता उपयुक्ततेच्या दृष्टीने ड्रोनसह एक विशेष परिपूर्ण असा संच तयार करून त्याचे वितरण या महिलांना केले आहे. यात आधुनिक फवारणी उपकरणे, स्मार्ट बॅटऱ्या, बॅटऱ्या वेगाने चार्ज करू शकणारे चार्जर्स, पीएच (pH) मीटर्स, अनिमोमीटरसारखी हवामानमापन साधने अशा अत्याधुनिक उपकरणांचा समावेश आहे. या प्रत्येक संचासाठी एका वर्षाची ऑन-साईट वॉरंटी (बिघाड वा नादुरुस्तीसंबंधी झाल्यास प्रत्यक्ष स्थळावर येऊन सेवा देणे), सर्व पैलूंचा अंतर्भाव असलेले विमा कवच आणि दोन वर्षांच्या देखभाल कराराची सुविधाही दिली गेली आहे. या अभियानाअंतर्गत महिला स्वयंसहाय्यता गटांमधील एका महिला सदस्याला प्रमाणित ड्रोन पायलट म्हणून, तर दुसऱ्या महिला सदस्याला ड्रोन सहाय्यक म्हणून प्रशिक्षण दिले गेले आहे. विशेषतः ज्यांना तांत्रिक दुरुस्तीमध्ये काहीएक गती आहे अशा सदस्यांना यासाठी प्राधान्य दिले गेले. अशा प्रकारच्या दृष्टिकोनामुळे ग्रामीण भागातील महिलांसाठी व्यवसायाच्या शाश्वत संधी, तर निर्माण होतातच, पण त्यासोबतच अत्याधुनिक तंत्रज्ञानाची हाताळणी आणि देखभालीच्या बाबतीतही हे समुदाय आत्मनिर्भर होतील याचीही सुनिश्चिती होते.

या योजनेची कृषी क्षेत्रासाठीचीही उपयुक्तताही तितकीच परिणाकारक आणि लक्षणीय आहे. या योजनेअंतर्गत वितरीत केलेले ड्रोन हे अचूक फवारणी करण्याच्या क्षमतेने सुसज्ज आहेत. या ड्रोनचा वापर करून एकाच दिवशी तब्बल २० एकर क्षेत्रापर्यंतची फवारणी करता येते. स्वाभाविकपणे यामुळे विशेषतः खते किंवा कीटकनाशकांच्या फवारणीसारख्या कामांसाठी लागणारा वेळ, येणारा खर्च आणि कराव्या लागणाऱ्या श्रमातही मोठ्या प्रमाणावर बचत होते हे समजून घ्यायला हवे. महत्त्वाचे म्हणजे शेतकऱ्यांना विशेषतः लहान शेतकऱ्यांना सेवा स्वयं साहाय्यता गटांकडून भाड्याने ड्रोनची सेवा घेणे तसे फायदेशीर ठरते. त्यामुळे शेतकरी असो वा स्वयंसहाय्यता गट दोन्हींच्या दृष्टीने हा व्यवहार निश्चितपणे लाभ मिळवून देणाराच ठरतो.

**शेतीपासून ते चित्रपटांपर्यंत : वेव्हज शिखर परिषदेअंतर्गतच्या क्रिएट इन इंडिया उपक्रमाच्या माध्यमातून ड्रोन दीदींना मिळाले राष्ट्रीय व्यासपीठ**

ब्रॉडकास्ट इंजिनीअरिंग कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेडने (BECIL) केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या सहकार्याने ‘इंडिया : अ बर्ड्स आय व्ह्यू’ या स्पर्धेचे आयोजन केले आहे. ‘नमो ड्रोन दीदी’सारख्या अनोख्या योजनेला पाठबळ देत या योजनेच्या माध्यमातून साकारलेल्या असंख्य प्रेरणादायी गाथा जगासमोर आणण्याच्या उद्देशानेच त्यांनी या आव्हानात्मक स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेअंतर्गत ड्रोनप्रेमी आणि चित्रपट दिग्दर्शकांना आकाशातून भारतातील वैविध्य आणि नवोन्मेषाचे दर्शन घडवणाऱ्या हवाई चित्रिकरणाच्या माध्यमातून छोटे व्हीडिओ तयार करण्याचे आव्हान दिले गेले आहे. ही स्पर्धा खुला गट आणि ड्रोन दीदींसाठीचा समर्पित गट अशा दोन गटांमध्ये आयोजित केली गेली आहे. सप्टेंबर २०२४मध्ये या स्पर्धेला सुरुवात झाली होती. तेव्हापासून आतापर्यंत ब्रॉडकास्ट इंजिनीअरिंग कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेडकडे या स्पर्धेसाठी १०००पेक्षा जास्त स्पर्धकांनी नोंदणी केली. या स्पर्धेसाठी ड्रोन दीदी या विशेष गटाअंतर्गत दिलेले विषयही तितकेच रंजक आणि व्यापक होते. याअंतर्गत, भारताचा समृद्ध वारसा, भारतातील तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नवोन्मेष, कृषी प्रक्रियेतील विशिष्ट क्रिया प्रक्रिया तसेच ड्रोनच्या वापरामुळे लोकांच्या जीवनमानात घडून आलेले बदल वा सुधारणा या सगळ्याचे व्हीडिओ स्वरूपातील दस्तऐवजीकरण करण्यासारख्या विषयांचा यात समावेश होता.

या महिलांनी टिपलेली दृश्यांमधील कथा केवळ सिनेमॅटिक मूल्ये असलेल्या नाहीत, तर त्या आशयगर्भित कथा आहेत. त्यांच्या प्रत्येक दृश्यातून-फ्रेममधून वंचिततेपासून ते आधुनिकतेच्या दिशेने झालेल्या वाटचालीचे दर्शन घडते. या स्पर्धेकरता भरघोष बक्षिसांचीही तरतूद केली गेली आहे. त्याअंतर्गत प्रथम पारितोषिक म्हणून १लाख रुपये द्वितीय पारितोषिक म्हणून ७५ हजार रुपयांचे रोख बक्षीस दिले जाणार आहे. याशिवाय डिजिटल प्रमाणपत्रेही दिली जाणार आहेत. इतकेच नाही, तर या स्पर्धेतल्या विजेत्यांना मुंबईत होणार असलेल्या वेव्हज २०२५ या परिषदेत आपले व्हीडिओ सादर करणाची सन्मानाची संधीही मिळणार आहे. यामुळे स्वाभाविकपणे या स्पर्धेबद्दलचा स्पर्धकांचा रोमांच टीपेला पोहोचला आहे. इतकेच नाही, तर या स्पर्धेमधील सर्वोच्च पाचांमध्ये येणाऱ्या स्पर्धकांना वेव्हज शिखर परिषदेत ड्रोनच्या माध्यमातून थेट प्रक्षेपण करण्यासंबंधीच्या स्पर्धेत भाग घेऊन सर्वोत्तम दिग्दर्शक-कलाकाराचा पुरस्कार पटकावण्याची संधीही मिळणार आहे.

नमो ड्रोन दीदी योजना आणि वेव्हज शिखर परिषद अंतर्गत सुरू असलेल्या क्रिएट इन इंडिया या स्पर्धात्मक उपक्रमाचा घडवून आणलेला हा संगम म्हणजे काही धोरणांचे एकात्मीकरण नाही, तर त्याही पलीकडे हा संगम म्हणजे पारंपरिकपणे पुरुषप्रधान मानल्या गेलेल्या क्षेत्रांमधील महिलांसाठी लिंगभेदाच्या असलेल्या भिंती मोडीत काढून नव्या संधीची दारे खुली करणारा ठोस प्रयत्न आहे.

**पुढची दिशा**

मुंबईत होणार असलेल्या वेव्हज शिखर परिषदेत ‘इंडिया : अ बर्ड्स आय व्ह्यू’ या आव्हानात्मक स्पर्धेच्या माध्यमातून या पथदर्शी महिला पायलट्सनी टिपलेल्या विलक्षण हवाई दृश्यमालिकेचे दर्शन अवघ्या जगाला घडणार आहे. त्यांनी टिपलेल्या या दृश्यांमधून केवळ भारताच्या भूप्रदेशाच्या वैविध्याचेच दर्शन घडणार नाही, तर त्याही पलीकडे या दृश्यांमधून त्यांच्यातील कौशल्यांचे आणि ड्रोन तंत्रज्ञानाला कृषी क्षेत्राशी जोडून घेतल्याने त्याचे कृषी क्षेत्रासह त्याही पलीकडे घडून आलेल्या सकारात्मक परिणामांचे दर्शन घडणार आहे. खरे तर ही आव्हानात्मक स्पर्धा ही एका अर्थाने एका जागतिक मंचावर तंत्रज्ञान आणि सक्षमीकरणाचा संगम घडवून आणणारी स्पर्धा ठरणार आहे. इतकेच नाही तर, भारताच्या ड्रोन दीदींच्या मनातील भावना, त्यांची प्रतिभा, आणि त्यांच्यातील नवोन्मेषाचे दर्शन अवघ्या जगाला घडेल याची सुनिश्चिती या स्पर्धेने केली आहे.

या योजनेचा परिणाम एवढा व्यापक आहे की खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही त्याची दखल घ्यावी लागली होती. त्यामुळेच तर मार्च २०२४ मध्ये X या समाज माध्यमावर एक विशेष संदेश लिहीत नमो ड्रोन दीदींच्या नवोन्मेषाची, त्यांच्या जुळवून घेण्याच्या वृत्तीची आणि त्यांच्या आत्म निर्भरतेच्या दिशेने वाटचालीची प्रशंसा केली होती. या संदेशात त्यांनी म्हटले होते की, नमो ड्रोन दीदी म्हणजे नवोन्मेष, उपयुक्तता आणि आत्मनिर्भरतेची प्रतीके आहेत. आमचे सरकार महिलांच्या सक्षमीकरणासाठी ड्रोनच्या ताकदीचा प्रभावीपणे वापर करत आहे.

सरकारद्वारे मिळणारे सातत्यपूर्ण पाठबळ, काटेकोर प्रशिक्षण, डिजिटल जगताचा प्रत्यक्ष अनुभव आणि क्रिएट इन इंडिया चॅलेंजसारखी सर्जनशील व्यासपीठे या सगळ्याच्या माध्यमातून भारत अवघ्या जगाला ठामपणे सांगतो आहे की, तंत्रज्ञान हे कुणाला वगळण्याचे नाही तर, सक्षमीकरणाचे माध्यम असायला हवे. आणि आपण जेव्हा केव्हा सक्षमीकरणाबद्दल बोलतो, तेव्हा आज ग्रामीण भागातल्या ड्रोनसारखे तंत्रज्ञानाधारीत उपकरण सक्षमतेने हाताळणाऱ्या या महिला पाहिल्या तर, त्यांनी आता त्यांच्या भरारीला कोणत्याही सीमांची मर्यादा नाही हेच सिद्ध करून दाखवले असल्याचे निश्चितच म्हणता येईल.

# वेळेच्या नियोजनासाठी घड्याळाची गरज






रवींद्र तांबे

जीवनात जे वेळेचे महत्त्व समजून घेत नाहीत ते जीवनात कधीही यशस्वी होत नाहीत. तेव्हा वेळेनुसार चालणारी माणसे त्यांच्या आयुष्यात यशस्वी होतात. त्यासाठी जीवनात वेळेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जगण्यासाठी जशी आपल्याला अन्नाची गरज असते तशी प्रत्येकाच्या जीवनात वेळेसाठी घड्याळाची आवश्यकता असते. जी व्यक्ती वेळेचे महत्त्व समजून घेते तीच व्यक्ती जीवनात यशस्वी होते हा निसर्गाचा नियम आहे. आपल्याला जीवनात यश संपादन करायचे असेल, तर वेळेचे नियोजन अतिशय महत्त्वाचे आहे. एकदा वेळ निघून गेली की परत येत नाही. तेव्हा प्रत्येकांनी आपल्या जीवनात वेळेचा दुरुपयोग न करता वेळेचे नियोजन करून त्याचे सोने करायला हवे. तरच आपण जीवनात यशवंत होऊ शकतो. त्यासाठी प्रत्येकांनी वेळेचे महत्त्व लक्षात घेऊन आपली कामे करायला हवीत.

विद्यार्थ्यांच्या जीवनात वेळेला खूप महत्त्व आहे. विद्यार्थी दशेमध्ये एकदा गेलेली वेळ परत येत नाही. तेव्हा वेळ वाया जाणार नाही या दृष्टीने विद्यार्थ्यांनी सुद्धा वेळेचे नियोजन करावे. यातच त्यांचे यश अवलंबून असते. शैक्षणिक वर्ष सुरू होऊन फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मुंबई, अमरावती, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा झालेल्या आहेत. कदाचित मे महिन्यामध्ये दोन्ही परीक्षांचे निकाल जाहीर होतील, तर काहींच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. तेव्हा विद्यार्थी मित्रांनी परीक्षेच्या दृष्टिकोनातून वेळेकडे दुर्लक्ष करू नये. आता दहावी आणि बारावीची परीक्षा संपली आहे. काही दिवस विश्रांती घेऊन नंतर पुढे बघू. वेळ कोणासाठीही थांबत नाही. जो थांबला तो संपला. आता परीक्षा संपली तरी निकालापर्यंत मिळणाऱ्या वेळेचे सोने करता आले पाहिजे. तोच जीवनात यशस्वी होतो. तेव्हा आतापर्यंत वेळेकडे दुर्लक्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आता वेळेकडे लक्ष द्यावा. नंतर पश्चाताप करून घेण्यापेक्षा अजून वेळ निघून गेलेली नाही. त्यात वय सुद्धा वाढत असते. असे असते तरी आतापासून वेळेचे महत्त्व लक्षात घेऊन वेळेनुसार अभ्यासाकडे तसेच अवांतर वाचनाकडे लक्ष द्यावा. त्यामुळे परीक्षेच्या कालावधीत कोणत्याही प्रकारचे दडपण येणार नाही.

माझे जिवलग मित्र किशोर राणे यांचे २३ एप्रिल, २०१७ रोजी कणकवलीमध्ये लग्न झाले तसे त्यांनी लग्नाचे निमंत्रण सुद्धा मला दिले होते. या घटनेला अजून चार दिवसांनी आठ वर्षे पूर्ण होतील; परंतु माझ्या विभागाच्या परीक्षा सुरू असल्यामुळे मला जाणे शक्यच नव्हते. तसे अंतरही एका दिवसामध्ये परत येणारे नव्हते. तशा त्यांना मोबाईलवरून लग्नाच्या शुभेच्छा सुद्धा दिल्या होत्या. त्यानंतर १३ मे, २०१७ रोजी त्यांना त्यांच्या कार्यालयात भेटून शुभेच्छा देऊन भेटवस्तू म्हणून घड्याळ दिले होते. त्यांनी त्याचा सन्मानपूर्वक स्वीकार केला. मला म्हणाले की, साहेब तुम्ही यायला हवे होते. त्यानंतर त्यांनी मला माझ्या मोबाईलवर संदेश पाठविला. त्या संदेशामध्ये किशोर राणे लिहितात की, “आपल्या भेटीने आम्ही आभारी आहोत.... आपण आम्हाला वेळेची किंमत समजावून दिलीत.... धन्यवाद .”

खरच हे शब्द तरुण पिढीला प्रेरणा देणारे आहे. याचा अर्थ आजच्या विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे आवश्यक आहे. कारण कोणत्याही गोष्टीचे नियोजन करीत असताना वेळेकडे पाहिले जाते. वेळेकडे पाहत असताना त्यात घड्याळाची प्रमुख भूमिका असते. कोणतेही काम वेळेत पूर्ण करायचे असेल, तर घड्याळ डोळ्यांसमोर असले पाहिजे. तरच आपण वेळेत काम पूर्ण करू शकतो. जीवनात वेळेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यासाठी घड्याळ खूप मोलाची भूमिका पार पाडीत असते. तेव्हा प्रत्येकाच्या जीवनात घड्याळाला महत्त्व आहे. आज प्रत्येकाच्या हातात मोबाईल असला तरी प्रत्येकाच्या मनगटावर घड्याळ असते. त्यामुळे तो वेळ पाहून आपली कामे करू शकतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या जीवनात घड्याळ हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. घड्याळामुळे विद्यार्थ्यांना वेळ समजते. यामुळे अभ्यासासाठी वेळेचे नियोजन करणे सोपे जाते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी एक लक्षात ठेवले पाहिजे की, आपण वेळेसाठी नसतो, तर वेळ आपल्यासाठी असते. प्रत्येकांनी आपल्या मनगटातील घड्याळ फॅशन म्हणून त्याकडे पाहू नये, तर त्याचा वेळेसाठी योग्य प्रकारे उपयोग करावा. म्हणजे आपला वेळ वाया जाणार नाही. सध्या कडक उन्हाळा चालू असून अधूनमधून अवकाळी पाऊस पडत आहे. तेव्हा काही अडथळे निर्माण होऊ शकतात. त्यावर मात करून पुढे गेले पाहिजे. मात्र घड्याळाकडे नजर ठेवावी लागेल. आज नको, उद्यापासून काम करू, उद्या नको परवापासून कामाला लागू असे करत असू तर वेळ वाया जात आहे.

प्रत्येकाच्या जीवनात वेळ आणि घड्याळाला महत्त्व आहे. ज्याप्रमाणे माझे मित्र किशोर राणे यांनी जसे घड्याळामुळे आम्हाला वेळेची किंमत समजली असे लिहिले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी मोबाईलमध्ये वेळ घालवीत वेळ वाया घालविण्यापेक्षा वेळेचा चांगल्या कामासाठी वापर करावा. त्यासाठी घड्याळाचा योग्यप्रकारे वापर करावा. बऱ्याच वेळा परीक्षागृहात घड्याळ नसते. स्पर्धात्मक परीक्षांसाठी घड्याळ परीक्षा केंद्रात आणण्यास परवानगी नसते. अशा वेळी प्रत्येक परीक्षागृहात घड्याळ असावे. काही ठिकाणी घड्याळ असून बंद अवस्थेत असताना दिसतात. ती परीक्षेपूर्वी दुरुस्त करून चालू करण्यात यावीत. तेव्हा जीवनात यशवंत होण्यासाठी वेळेच्या नियोजनासाठी घड्याळाची नितांत गरज असते हे सर्वांनी लक्षात ठेवायला हवे.

## राशिभविष्य

शनिवार ,१९ एप्रिल २०२५

**|| पंचांग ||**

आज मिती चैत्र कृष्ण षष्ठी शके १९४७. चंद्र नक्षत्र मूल, पूर्वाषाढा. योग शिवा, सिद्ध. चंद्र राशी धनू. भारतीय सौर २९ चैत्र शके १९४७. शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.१८ मुंबईचा चंद्रोदय ९.४८ , मुंबईचा सूर्यास्त ६.५६ मुंबईचा चंद्रास्त ८.०९ राहू काळ ३.४७ ते ५.५२, सौर ग्रीष्म ऋतु प्रारंभ, शुभ दिवस.

**|| भविष्य ||**

**मेष** : प्रत्येक कार्यात यश मिळेल.

**वृषभ** : इच्छापूर्तीचा दिवस, महत्त्वाचे काम होईल.

**मिथुन** : कलाकारांना मोठी प्रसिद्धी व यश मिळेल.

**कर्क** : कार्यमग्न राहावे लागेल.

**सिंह** : तरुण-तरुणींचे प्रश्न सुटतील.

**कन्या** : आरोग्याकडे लक्ष ठेवणे हितकारक ठरेल.

**तूळ** : लाभ होण्याची शक्यता.

**वृश्चिक** : व्यावसायिक उत्सव प्रदर्शनातून मोठे लाभ.

**धनू** : महत्त्वाची कामे हातावेगळी करू शकाल.

**मकर** : वास्तुविषयक व्यवहार होतील.

**कुंभ** : विवाह ठरू शकतात

**मीन** : आजचा दिवस अनुकूल ठरेल.

## जनसंवाद

### प्राणी संरक्षण कायद्याची अतिरेकी अंमलबजावणी

नुकत्याच वाचनात आलेल्या एका बातमीनुसार, दापोली तालुक्यातील मांदिवली गावात, घरात शिरलेल्या धामण सापाला मारले म्हणून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. हे वाचून आश्चर्यच नव्हे, तर तथाकथित प्राणीप्रेमींमधील सद्सदविवेकबुद्धीच्या अभावाबद्दल कीव आली. आपल्या कुटुंबाच्या सदस्यांचा जीव वाचवण्याच्या एकमेव हेतूपायी त्यांनी त्या सापाची हत्या केली हे सर्वश्रुत असूनही कोणीतरी प्राणीमित्रांना प्रसिद्धीचे श्रेय हवे म्हणून त्याच्यावर हा अन्याय होणं योग्य आहे का? अनादिकालापासून साप ह्या प्राण्याबद्दल, मग तो कुठल्याही प्रजातीचा असो, जनमानसांत भय असते. कारण काही साप हे विषारी असतात आणि त्यांच्या दंशाने मनुष्य मृत्यू पावू शकतो. साप घरात शिरला असेल तर तो विषारी आहे की नाही हे जाणून घेण्याएवढे ज्ञान सर्वसामान्य माणसात नसते. साप घरात शिरल्यावर तो देखील एखाद्या कोनाड्यात लपून बसतो. मग आपल्या मुलाबाळांवरील संभाव्य मृत्यूची टांगती तलवार असताना एखादा सुबुद्ध माणूस काय भूमिका घेणार? "हे सापा बाहेर ये आणि तुझे आधार कार्ड दाखव. मला तुझी जात कळेल" असे त्याला नम्र आवाहन त्याने करावे अशी अपेक्षा करावी काय? अशा परिस्थितीत साप मारणे हाच उपाय असतो. तो मेल्यानंतरच कळते की तो साप विषारी होता की नाही. मग स्व-संवर्धन (सेल्फ डिफेन्स) मध्ये एखाद्या माणसाची केलेली हत्या देखील गुन्हा मानला जात नाही त्या संदर्भात ही सर्प हत्या गुन्हा ठरू शकते काय? प्राणीप्रेमींनी जरूर त्यांच्या संरक्षणाची काळजी घ्यावी; परंतु असली फाजील आणि अविवेकी कारवाई करताना एखाद्या मानवावर अन्याय तर होत नाही ना याचे भान बाळगावे.

**- दीपक मच्याडो,** वसई

### योग्य निर्णय

हैदराबादमधील कंचागची बाहुली परिसरात १०० एकर जंगल नष्ट करण्यात आला प्रकरणी सुप्रीम कोर्टाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कोर्टाने तेलंगणा राज्य सरकारला हे जंगल पूर्ववत स्थितीत आणण्यासाठी कृती आराखडा सादर करण्याचा न्यायालयाचा निर्णय योग्यच आहे. अधिकाऱ्यांना वन्यजीवांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याचे निर्देश कोर्टाने दिले आहेत. हे जंगल पूर्ववत स्थितीत येण्यासाठी किती वर्षे लागणार आहेत. हैदराबाद विद्यापीठाजवळ असलेल्या ४०० एकर जंगल क्षेत्राचा वापर विकास प्रकल्पासाठी करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. वनसंरक्षणाचे उल्लंघन केल्याबद्दल प्रथम राज्य सरकारवर कारवाई केली पाहिजे. कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न पाळता तब्बल शंभर एकर जंगल उद्ध्वस्त कसे करण्यात आले. कोणाच्या परवानगीने हे जंगल तोडण्यात आले?आयटी पार्क बांधण्यासाठी दुसरी जागा नव्हती का? हे क्षेत्र ‘जंगल’ म्हणून अधिसूचित न केल्याने सध्याची समस्या उद्भवली आहे. विद्यार्थ्यांनी निषेध तीव्र केल्याने हे तोडलेले जंगल पुन्हा उभे राहील. जंगल तोडण्यापेक्षा जंगल उगवणे कठीण आहे, हे तेलंगणा सरकारला समजले नाही का?

**- विवेक तवटे,** कळवा, ठाणे

### शिवधनुष्य अखेरपर्यंत पेलावेच लागेल

वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक दोन्ही सभागृहांत बहुमताने मंजूर झाल्यानंतर देशांतर्गत युद्धाला तोंड फुटेल ही जनसामान्यांची अटकळ खरी होत आहे. वक्फवरून पश्चिम बंगाल मध्ये तर बांगलादेशातील अराजकागत परिस्थिती निर्माण झाली होती. परवा नाशिक येथे अनधिकृत दर्गा बांधकामाबाबत उच्च न्यायलयाच्या आदेशाचे पोलीस यंत्रणा पालन करीत असताना नागपूरप्रमाणे हजारोंच्या जमावाने पोलिसांवरच पूर्वनियोजित हल्ला करून त्यांना जखमी केले. गुप्तचर यंत्रणेने त्यांच्या पूर्वतयारीचा शोध आधीच घेतला असता, तर २१ पोलिसांना जखमी व्हावे लागले नसते आणि पोलीस वाहनांचेही नुकसान झाले नसते. सर्वोच्च न्यायालयाने काही सुधारणांना स्थगिती दिल्यामुळे सरकार विरुद्ध लढाई जिंकल्याच्या आवेशात बोर्डाची आक्रमकता वाढीस लागेल! केंद्राला पूर्ण ताकदीनिशी पण सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनांचा आदर राखून हे शिवधनुष्य अखेरपर्यंत पेलावेच लागेल अन्यथा पुढील पाऊल म्हणजे समान नागरी कायद्याची वाट अधिक खडतर होऊ शकते!

**- हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर.

### आपला तो बाळ्या, दुसऱ्याचं ते कार्ट

पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गेल्या दहा वर्षांपासून मुस्लीम तुष्टीकरणाचा जो अजेंडा चालविला आहे. त्याचा सर्वोच्च बिंदू आता वक्फ कायद्याच्या विरोधात तेथे सुरू असलेल्या आंदोलन दरम्यान दिसून येत आहे. वक्फ कायद्याच्या विरोधातील आंदोलनात तेथील मुर्शिदाबाद येथील या हिंसाचारात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. पण निर्लज्जपणाचा कळस आहा, तिकडे या आंदोलना दरम्यान मुर्शिदाबाद येथील हिंदू मोठ्या संख्यने विस्थापित होत असताना पश्चिम बंगालमधील सत्तारूढ तृणमूल काँग्रेस पक्षाचा खासदार आणि गुजरातमधील माजी क्रिकेटपटू यूसुफ पठान यांनी याच दरम्यान आपला चहाचा आस्वाद घेत असल्याचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे. यावर सर्व सामन्यांकडून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली आहे. आज काँग्रेस, शिवसेना उद्धव, समाजवादी अखिलेश, राष्ट्रवादी शरद सहित देशातील समस्त विरोधी पक्ष सत्तारूढ केंद्र सरकारच्या नावाची अखंड जपमाळ जपत असते की, आज देशात लोकशाही मूल्यांचे हनन पंतप्रधान नरेन्द्र मोदी आणि त्यांच्या सरकार द्वारा सातत्याने केले जात आहे. पण त्याच वेळी त्यांना आपल्या विरोधी पक्ष शासित राज्यात लोकशाही मूल्यांचे बीभत्स स्वरूप दिसत असले तरी याबाबत मात्र ही मंडळी चिडीचुप्प असतात. मग यांचे व्यक्ती स्वातंत्र्य, लोकशाही मूल्य कुठं गळून पडतात असा प्रश्न पडतो. आज देशातील विरोधी पक्षाच्या केंद्रस्थानी सर्व सामान्य जनता ही फक्त दाखविण्यापुरती असुन केवळ ‘सत्ताप्राप्ती’च हे केंद्रस्थानी आहे. त्यासोबत आपल्याकडील असलेल्या राज्यातील सत्ता कसे करून टिकून ठेवा हेच आज पश्चिम बंगालमधील घटनेतून स्पष्ट दिसून येत आहे.

**- अविनाश देशपांडे,** पुणे



# ब्रेख्तियन शैलीतील फॅन्टसी

भालचंद्र कुबल
पाचवा वेद



मागील आठवड्यातील "तोडी मिल फॅन्टसी" या नाटकावरील माझ्या लेखावर अनेक उलट सुलट प्रतिक्रिया समाज माध्यमांवर वाचायला मिळाल्या. जवळपास प्रत्येकानेच गिरणी कामगारांच्या अद्यापही सुरू असलेल्या संपाबाबत तात्कालिन राज्यकर्ते आणि नेते मंडळीना जबाबदार धरले. सिनेअभ्यासक अशोक राणे यांनी जी भूमिका मांडली त्यातील एका विधानाचा उहापोह या लेखात करावा म्हणतोय. हे नाटक ब्रेख्तियन शैलीतील आहे, हे ते विधान...! बऱ्याच वाचक वा प्रेक्षकवर्गाला ब्रेख्तियन शैली म्हणजे काय हे ज्ञात असेलच हे गृहित धरता येणार नाही, त्यामुळे ही शैली सोप्या भाषेत समजावणे गरजेचे वाटते म्हणूनच हे तोडी मिल फॅन्टेसीच्या आनुषंगाने ब्रेख्तियन विश्लेषण...!

युजेन बर्थोल्ड फ्रेडरिक ब्रेख्त (१० फेब्रुवारी १८९८ - १४ ऑगस्ट १९५६), ज्याला बर्टोल्ट ब्रेख्त आणि बर्ट ब्रेख्त म्हणून ओळखले जाते, ते एक जर्मन रंगभूमी अभ्यासक, नाटककार आणि कवी होते. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांना म्युनिकमध्ये नाटककार म्हणून पहिले यश मिळाले आणि ते १९२४ मध्ये बर्लिनला गेले, जिथे त्यांनी द थ्री पेनी ऑपेरा लिहिले. कार्ल मार्क्स व चॅर्ली चॅप्लीन या महान व्यक्तींचा त्यांच्या जीवनावर प्रचंड प्रभाव होता. ब्रेख्त हे स्वतः कवी असल्याने कविता ते नाट्यरुपांतरण हे माध्यमांतर करता करता नाट्यचळवळीत त्या सादरीकरणाचा प्रयोग पुढल्या काळात नाट्यअभ्यासकांसाठी सिद्धांत ठरला, ज्यास आज आपण ब्रेख्तियन शैली म्हणून संबोधतो. "तोडी मिल फॅन्टसी" या नाटकाच्या निमित्ताने या नाट्यशैलीचा पुनरुच्चार झाला आहे. भारतीय रंगभूमीसाठी ब्रेख्तियन शैली अत्यंत पूरक समजली गेली आहे; परंतु मराठी रंगभूमी सोडल्यास या शैलीचा वापर इतर भाषांमधे फारसा झालेला आढळत नाही. मराठीत अगदी महात्मा फुले यांच्या तृतियरत्न या नाटकापासून सुरू झालेली ही शैली अजब न्याय वर्तुळाचा, तीन पैशाचा तमाशा ते तोडी मिल फॅन्टसीपर्यंत येऊन स्थिरावते. केतन मेहतांच्या "भावनी भवाई" या चित्रपटावरही या शैलीचा प्रभाव आढळतो.

रंगभूमी अभ्यासक सतीश पावडे यांनी या शैलीच्या केलेल्या सूक्ष्म अभ्यासामुळे व काही सैद्धांतिक मुद्दयांमुळे हे नाटक बघणे सोपे होईल. हल्ली कुठल्याही मॉडर्न टेम्परामेंट बाळगणाऱ्या नाटकावर प्रायोगिकतेचा शिक्का मारला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे या सादरीकरणात प्रायोगिकता ही आढळतेच. सतीश पावडेनी ब्रेख्तियन नाट्यशैलीची १५ वैशिष्ट्ये सांगितली आहेत पैकी काही ठळक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे... १) ही संकल्पना रम्य स्वप्नवादी, स्वच्छंदी पद्धतीचा विरोध दर्शवणारी असते. म्हणूनच या शैलीस एपिक शैली असेही म्हटले जाते. २)ही शैली कथावृत्तांतामुळे प्रेक्षकांची विचारशक्ती जागृत करणारी ठरते. ३) मनुष्यजातीच्या न्यायासाठी परिवर्तनाचा सूर त्यात असतो. ४) प्रत्येक दृष्य स्वतंत्र; परंतु सर्व स्वतंत्र दृष्यांची मालिका त्यातून निर्माण होते. ५) कथानक परिपूर्ण व निर्णयापर्यंत पोहोचविणारे असते. ६) यात तर्क आणि युक्तिवादावर भर दिला जातो. ७) यामध्ये स्थळ, काळ, कृती, पद्धती, भावस्थिती यांच्यातील एकतेची गरज नसते. ८) सामाजिक प्रश्नाचे प्रदर्शन, अशी एकंदर १५ वैशिष्ट्यांचा विचार करून "तोडी मिल फॅन्टसी" हे नाटक पाहावे लागते.

वरील सैद्धांतिक आणि थिअरी देण्यामागचे कारण असे की, या नाटकाचा प्रेक्षकवर्ग निराळा आहे, वेगळा आहे, हटके आहे. पारंपरिक दिवाणखानी, ठोकताळ्यांनी समृद्ध असणारी नाटके बघणारा प्रेक्षक वेगळा आणि हे नाटक बघणारा प्रेक्षक वेगळा आहे. या नाटकाचा जॉनर म्हणजे तरुणांनी तरुणांसाठी तयार केलेली सामाजिक प्रश्नांना पोक करणारी ब्लॅक कॉमेडी आहे. ही तरुण मुले गिरणी कामगारांच्या संपाने उद्ध्वस्त झालेल्या आईबापांच्या मुलांची मुले आहेत. आणखी किती वर्षे संपाच्या जखमा उगाळत राहायचं? असं या मुलांच बेधडक म्हणणं आहे. भारतीय रंगभूमी या नाटकाची नोंद व दखल घेईलच मात्र मराठी रंगभूमी कितपत दखल घेईल याबाबत शंका आहे. गेली अडीच वर्षे सुरू असलेली सुजय जाधव लिखित व विनायक कोळवणकर दिग्दर्शित ही एक म्युझिकल उधळण आहे, मात्र अंकुश चौधरीसारख्या प्रमोटरने या नाटकाची जबाबदारी स्वीकारल्याने हे नाटक जास्तीत जास्त प्रेक्षक पाहतील असा आशावाद बाळगू..! हा या नाट्यनिरीक्षणाचा मध्यार्ध आहे. उत्तरार्ध अभी बाकी है...! वाचकहो...!







# रिलॅक्स

## चांगल्या माणसांचे जग



फिरता फिरता
मेघना साने



लहानपणी आई आम्हाला सांगायची, जगात चांगली माणसे खूप असतात. त्यामुळेच तर हे जग चालत असते. मला या गोष्टीचा नेहमीच अनुभव येत गेला. २००० सालापूर्वी ज्यावेळी माझ्याकडे मोबाइल नव्हता, गाडी नव्हती, त्यावेळी कार्यक्रमांसाठी, शूटिंगसाठी लागणार सारा प्रवास मी बस, ट्रेन किंवा रिक्षातून करत असे. त्यावेळचं जगही आजच्यापेक्षा निराळं होतं. आज टीव्हीवरील बातम्या ऐकून धडकी भरत आहे. पण ज्या निर्मळ जगाचा मी अनुभव घेतला त्याच्या आठवणी सांगाव्याशा वाटतात.

एकदा माझी अंधेरीत कुठल्याशा बंगल्यात मालिकेच्या शूटिंगची डेट लागली होती. माझे शूटिंग संध्याकाळी ७ नंतर होते. रिक्षाने अंधेरीला तो बंगला शोधायलाही वेळ लागला. त्यावेळी GPS वगैरे काही नव्हते. रिक्षावाल्याने एक दोन दुकानांत विचारून ती जागा बरोबर शोधून काढली. मी रिक्षावाल्याला पैसेही दिले. पण तो म्हणाला, "आधी आत जाऊन बघा. तुम्हाला हवा तो हाच बंगला आहे की नाही आणि बंगल्यात कोणी आहे की नाही. तोवर मी थांबतो. काही मदत लागली तर सांगा." मी आतमधे जाऊन आले. असिस्टंट डायरेक्टर आणि क्रू हजर झाले होते. मग रिक्षावाल्या काकांना 'अच्छा' करायला मी बाहेर आले आणि 'थँक्स' म्हणाले. ते म्हणाले, "अहो, हल्ली दिवस चांगले नाहीत ना. म्हणून काळजी घ्यावी लागते." अनेक कार्यक्रमांच्या दौऱ्यानंतर मी घरी परतत असताना रिक्षावाल्यांनी मला रात्री १२ वाजता, १ वाजता सुखरूप घरी पोहोचवले. नाटकाचे प्रयोग, कार्यक्रमांचे दौरे मी रिक्षावाल्यांच्या भरवशावरच करत आले आहे.

एकदा अशी गंमत झाली आहे की, मी व माझी विद्यार्थिनी कॉलेजमधील एका कार्यक्रमाला निघालो होतो. कार्यक्रमानंतर पुस्तके विकण्यासाठी मी माझी वीस-पंचवीस पुस्तके एका पिशवीत घेतली होती व ही पिशवी विद्यार्थिनीला सांभाळायला दिली. आम्ही रिक्षाने कॉलेजमध्ये पोहोचलो. कॉलेजचे सर स्वागताला आले. या गडबडीत विद्यार्थिनीने पिशवी रिक्षातून उतरवलीच नाही. रिक्षा दूर गेल्यावर तिला आठवण आली. रिक्षावाल्या काकांनी सकाळी रिक्षा साफ करायला घेतली तेव्हा सीटच्या मागच्या बाजूला ठेवलेली पिशवी त्यांना दिसली असावी. दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता मला एक अनोळखी फोन आला तरी मी तो घेतला. पलीकडून कोणीतरी बोलत होतं, "मॅडम, रिक्षावाला बोलतोय. तुमची पुस्तके रिक्षात राहिली होती. ती मी तुमच्या सोसायटीच्या गेटवर वॉचमनकडे दिली आहेत." मला आश्चर्यच वाटले. याला माझे घर कसे काय कळले? रिक्षा तर मी वेगळ्या ठिकाणाहून पकडली होती. मी विचारले, "भले शाब्बास! तुम्हाला माझा पत्ता कसा काय कळला?" रिक्षावाले काका म्हणाले, "ताई, ती पुस्तकं मी बघितली. प्रत्येक पुस्तकावर मागे तुमचा फोटो. पुस्तकाच्या पहिल्या पानावर तुमचा पत्ता आणि फोन नंबरसुद्धा होता. फोटोवरून मी ओळखलं की, संध्याकाळी पाच वाजता याच ताई रिक्षात बसल्या होत्या. आता तो वॉचमन गेटजवळ रिक्षा पार्क करू देईना म्हणून तुमच्या ब्लॉकपर्यंत पुस्तकं आणून देता आली नाहीत. ती वॉचमनकडेच ठेवली आहेत. त्याच्याकडून तुम्ही घ्या." पुस्तकं मिळाल्याचा आनंद झाला. त्याहीपेक्षा रिक्षावाल्याचे कौतुक वाटले.

जगात चांगली माणसे असतात यावर माझा प्रथमपासूनच विश्वास आहे. हल्लीचीच, म्हणजे पाच वर्षांपूर्वीची गोष्ट. दापोलीतील केशवराज डोंगरावरती आम्ही बरेच नातलग निघालो होतो. काही वयस्कर मंडळींना डोंगर चढता येणार नाही म्हणून त्यांना घेऊन मी व माझे पती आम्ही दाबके आळीत असलेल्या एका हॉटेल-कम-घरात थांबलो. नातवंडांना काकांबरोबर पाठवून दिले. त्यांना डोंगर चढायचा उत्साह वाटत होता. दाबके आळीतील त्या हॉटेलमधे आम्ही छान नीर डोसा, कोकम सरबत, कोथिंबीर वडी याचा आस्वाद घेत बसलो. मंडळी डोंगरावरून परत येईपर्यंत आमचा हा टाईमपास सुरू होता. तासाभराने सर्व नातलग डोंगर उतरून आले. त्यांच्याबरोबर आमची दोन्हीही नातवंडे दिसली नाहीत. म्हणून मी विचारले, "विहान आणि समिहान दिसत नाहीत. कोणाबरोबर आहेत?" काका म्हणाले, "ते दोघे तर धावत तुमच्याकडेच निघाले होते. तुम्हाला भेटले नाहीत?" आमच्या लक्षात आले की आम्ही हॉटेलात आत बसलो होतो म्हणून आम्ही मुलांना दिसलो नाही. ती आम्हाला शोधत पुढे निघून गेली असावी. आता या छोट्याशा रस्त्यावर भाविकांची बरीच गर्दी होऊ लागली होती. हॉटेलमधेही जेवणाची वेळ झाल्यामुळे बरीच गिऱ्हाईके येत होती. आमच्या ग्रुपमधील तरुण मुले दोन-तीन गल्ल्यांमध्ये शोधून आली. पण या दोन्ही मुलांचा पत्ता नव्हता. हॉटेलमालकांच्या कानावर आमची ही गडबड पडली असावी. ते लगेच स्कूटर काढून आमच्या मुलांना शोधायला निघाले. माझ्या मिस्टरांना त्यांनी डबलसीट बसायला सांगितले. खूप दूरवर गेल्यावर आम्ही जिथे आमची गाडी पार्क केली होती त्या गाडीच्याजवळ दोन्ही मुले उभी दिसली. ती हरवली आहेत हे त्यांना माहीतच नव्हते! ते आमची सगळ्यांची वाट पाहत थांबले होते. पण मुलांना पाहून सर्वांचा जीव भांड्यात पडला. ऐन गर्दीची वेळ असूनही हॉटेल मालक आमच्या मुलांना शोधायला आले आणि काहीही नाते नसताना! याचे आम्हाला खूप अप्रूप वाटले.

नुकताच घडलेला आणखी एक प्रसंग. पंचवीस जानेवारी २०२५ ला माझ्या दोन पुस्तकांचे प्रकाशन होणार होते. त्याची तयारी मी व माझे मिस्टर करत होतो. प्रकाशनानिमित्त 'कोवळी उन्हे' हा आमचा कथा काव्याचा कार्यक्रमही आम्ही सादर करणार होतो. कार्यक्रमाची तालीम, प्रयोजकांकडे फेऱ्या, मित्रमंडळींना आमंत्रणे, हॉलवरील मॅनेजमेण्ट, पाहुण्यांना फोन, पत्र हे सारे करताना दोघांची खूप धावपळ होत होती. त्या धावपळीत बॅनर तयार करून आणताना मिस्टरांचे पाकीट रिक्षात राहिले. त्यात आमची सारी बँकेची कार्डे, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि प्रकाशनासाठी काढलेले पैसे होते. मिस्टरांनी ताबडतोब सर्व कार्डे ब्लॉक केली. पोलीस स्टेशनला चालत जाऊन रिपोर्ट केला. घरी यायला रिक्षासाठीसुद्धा पैसे नव्हते. हे ओळखून पोलीस कॉन्स्टेबलने त्यांना शंभर रुपये दिले. रात्री नऊ वाजता हे घरी आले आणि मला पाकीट हरवल्याची बातमी दिली. पण मला विश्वास होता की आपल्या मेहनतीचं काही वाया जाणार नाही. या ना त्या स्वरूपात आपल्याला ते परत मिळेल. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची रिहर्सल करत मी जागत होते. तो रात्री पावणेअकरा वाजता मला अनोळखी नंबरवरून एक फोन आला. तो मला अपेक्षितच होता. "मॅडम, तुम्ही मेघना साने का?" मी 'हो' म्हटले. "तुमच्या मिस्टरांचे पाकीट मला रिक्षात सापडले आहे. ते मी उद्या सकाळी तुम्हाला आणून देईन. फक्त मला माहीत असलेले एखादे दुकान सांगा. तिथे येऊन मी पाकीट देईन." मी प्रशांत कॉर्नरची खूण सांगितली. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता तो पाकीट घेऊन तिथे हजर होता.

मी विचारले की, "तुम्ही मला कसा काय फोन केलात?"

तो म्हणाला, "अहो त्यात 'कोवळी उन्हे' या कार्यक्रमाचे रंगीत कार्ड होते. त्यात तुमचा दोघांचा फोटो आणि खाली तुमचा नंबर होता. म्हणून मला फोन करता आला." माझ्या आभाराचीही वाट न बघता तो पटकन स्कूटरवरून निघून गेला. पाकीट उघडून बघितले, तर सर्व ऐवज जसाचा तसा होता!

# नाटकावर प्रेम करणारा...



जयवंत वाडकर

टर्निंग पॉइंट
युवराज अवसरमल



नाटक, जाहिराती, मालिका व चित्रपटातून अभिनयाची मुशाफिरी करणारा कलावंत म्हणजे जयवंत वाडकर. सध्या त्यांचे 'आज्जीबाई जोरात' हे नाटक सुरू आहे. नुकताच त्यांनी अभिनय केलेला 'जयभीम पँथर एक संघर्ष' हा चित्रपट रिलीज झालेला आहे.

जयवंतचे शालेय शिक्षण गिरगावमधील म्युनिसिपल शाळा (ठाकूरद्वार), चिकित्सक हायस्कूल, युनियन हायस्कूलमध्ये झाले. क्रिकेट खेळण्याची त्यांना आवड होती, त्यामुळे त्यांनी युनियन हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. तेथे पुरुषोत्तम बर्डे, लक्ष्मीकांत बेर्डे त्यांना सिनियर होते, तर विजय पाटकर त्यांना ज्युनिअर होते. चिराबाजारमध्ये होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये त्यांनी भाग घेतला होता. बालपणी त्यांनी शिवजयंती साजरी केली, छोटा प्रोजेक्टर सुरू करून चित्रपट पाहिला.

त्यानंतर हिंद विद्यालयात त्यांची अकरावी झाली, पुढे त्याचं शिक्षण सिद्धार्थ महाविद्यालयामधून झाले. त्या वेळी देखील ते क्रिकेट खेळायचे. प्रसिद्ध क्रिकेटर विनू मंकड त्यांचे कोच होते. त्यानंतर बँक ऑफ इंडियामध्ये ते नोकरीस लागले. बँकेतर्फे ते क्रिकेट खेळले. त्यांचा रेकॉर्ड आज देखील आहे, त्यांनी ८ रनमध्ये ५ विकेट घेतल्या होत्या. त्यावेळी त्यांचा उत्साह खूपच होता. त्याच वेळी त्यांच्या जीवनात टर्निंग पॉइंट आला. अभिनेते सतीश पुळेकर त्यांना एकांकिकेसाठी दिग्दर्शन करू लागले. वेगवेगळ्या एकांकिकेमध्ये त्यांनी भाग घेतला. ते त्याचे गुरू होते. प्रदीप पटवर्धन, प्रशांत दामले, विजय पाटकर हे सारे एकांकिकेमध्ये होते. लेखक शंकर पाटील, द. मां. मिरासदार यांच्या कथेवर एकांकिका केल्या. बँक ऑफ इंडियामध्ये आल्यानंतर तिथे विजय पाटकर, विजय पटवर्धन यांनी परत एकांकिका केल्या. राजन ताम्हणे, रवींद्र दिवेकर हे दिग्दर्शक त्यांना लाभले. त्यानंतर त्यांनी राज्य नाट्य स्पर्धेत भाग घेतला. पुढे अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झाले. ऊन पाऊस ही त्यांची एकांकिका प्रथम आली. जयंत सावरकरांनी त्यांना 'बेबंदशाही' या पहिल्या व्यावसायिक नाटकात घेतले. त्यांचे दिग्दर्शक होते मामा पेंडसे. साहित्य संघ मंदिरामध्ये आल्यानंतर त्यांच्यावर नाटकांचे संस्कार होत गेले. दारव्हेकर मास्तरांसोबत त्यांनी 'बाजीराव मस्तानी', 'राजसंन्यास' ही नाटके केली. विश्राम बेडेकर लिखित व दिग्दर्शित 'टिळक आणि आगरकर' हे नाटक त्यांनी केले. त्यामध्ये भक्ती बर्वे, प्रमोद पवार, श्याम पोंक्षे, निवेदिता जोशी, अतुल परचुरे हे कलावंत होते. त्यानंतर त्यांचा नाटकांचा प्रवास सुरू झाला. कार्टी प्रेमात पडली, रंगीत संगीत उचलबांगडी, कुणीतरी आहे तिथे, डेंजर डेंजर, लेकुरे उदंड झाली ही नाटके त्यांनी केली.

'तुझ्या वाचून करमेना' हा त्यांचा पहिला चित्रपट होता. त्यानंतर त्यांनी चंगू मंगू, एक गाडी बाकी अनाडी, आयत्या घरात घरोबा, आमच्या सारखे आम्हीच हे चित्रपट केले, त्याचवेळी त्यांना 'तेजाब' हा हिंदी चित्रपट मिळाला. हा चित्रपट प्रचंड गाजला. त्यामुळे जयवंत वाडकरसह सगळे कलाकार स्टार झाले. 'सो गया' गाण्यातील काही स्टेप्स माधुरीने बसविल्या होत्या. रात्री २ वाजता तिने त्यांच्याकडून तालीम करून घेतली होती. त्यानंतर त्यांनी 'सरफरोश' हा हिंदी चित्रपट केला. त्या शूटिंग दरम्यान आमिर खानने सेटवरच ज्युनिअर आर्टिस्टची रिहर्सल घेतल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. अक्षय कुमार सोबत त्यांनी 'बेबी' चित्रपट केला. निर्मात्यांचा वेळ वाया घालवू नये ही महत्त्वाची बाब अक्षय कुमारकडून शिकल्याचे वाडकरानी सांगितले. अजय देवगणबद्दल एक आठवण सांगताना जयंत वाडकर म्हणाले की, त्यांच्या 'शिकार' चित्रपटाचे शूटिंग पुण्यात होते व अजय देवगणचे शूटिंग गंगाजल चित्रपटाचे साताऱ्यात होते. तेंव्हा शॉर्टकट म्हणून तो कात्रजच्या बोगद्यातून यायचा व शूटिंग करून निघून जायचा. 'गुनाह' चित्रपटात त्यांनी अभिनेता इरफान खान सोबत काम केले. नंतर इरफानशी त्याची घट्ट मैत्री झाली. त्यांच्याकडून भरपूर गोष्टी जयवंतने शिकल्या.

'बायको असून शेजारी' नाटकासाठी त्यांना राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला आहे. 'चालू नवरा भोळी बायको' चित्रपटासाठी त्यांना बेस्ट कॉमेडियनचा ॲवॉर्ड मिळालेला आहे. झकाससाठी मिफ्ता ॲवॉर्ड मिळाले आहे. त्यानंतर कुठं कुठं शोधू मी तिला, चिकट नवरा, सुना येती घरा, माणूस या राधास्वामी दिग्दर्शित चित्रपटात त्यांनी काम केले. नटसम्राट चित्रपट त्यांनी केला.

'जयभीम पँथर-एक संघर्ष 'या चित्रपटात त्यांची निगेटिव्ह भूमिका आहे. एक वेगळ्याच भूमिकेत जयवंत वाडकरांचे रूप प्रेक्षकांना पाहायला मिळत आहे. या चित्रपटातील गायक आनंद शिंदेनी गायलेले 'माझ्या भीमाची जयंती' भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांवरील जयंतीचे हे गाणे गाजत आहे. गौरव मोरे सिरीयस भूमिकेमध्ये प्रेक्षकांना पाहायला मिळत आहे. दलित, जातीभेद या विषयावरील दमदार कथा या चित्रपटात पाहायला मिळत आहे. भदंत शीलबोधी थेरो यांच्या नवयान ड्रीमची ही निर्मिती आहे. दलित, शोषित बहुजन समाजातील घटकांवर अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर क्रांतीची ज्योत पेटवणाऱ्या प्रत्येक बहुजन संघटनेची आणि त्यांच्या संघर्षाची कथा या चित्रपटामध्ये पाहायला मिळणार आहे. दलितांमधील अत्याचार, बहुजन राजकारण, शिक्षण यांचं चित्रण करतानाच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे सामाजिक महत्त्व हा चित्रपट अधोरेखित करतो. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन निशांत नाथाराम धापसे यांनी केले आहे.

'आज्जीबाई जोरात' हे त्यांचं नाटक सध्या सुरू आहे. मुलांना गेजेटमधून कसे बाहेर काढायचे हा महत्त्वाचा विषय आहे. हा विषय सध्या काळाची गरज आहे व साऱ्यांनी हे नाटक पाहावे असे आव्हान त्यांनी केले.

# संतोषच्या 'फॅमिली'चा रंगभूमीवर 'पुन्हारंभ'...

राजरंग
राज चिंचणकर





जेव्हा जेव्हा नाट्यसृष्टीवर काही कारणांमुळे मळभ दाटून आले; तेव्हा तेव्हा संतोष पवार या रंगकर्मीने रंगभूमीला सजीव ठेवण्याचे बहुमोल कार्य बजावले; असे या कलावंताच्या बाबतीत नेहमी म्हटले जाते. अनेकविध नाट्यकृतींतून संतोष पवार याने त्याचे नाणे खणखणीत वाजवले आहेच; पण त्याचबरोबर, नवनवीन युवा कलाकारांना रंगमंच उपलब्ध करून देण्याचे काम तो गेली अनेक वर्षे सातत्याने करत आहे. 'संतोष पवार स्कूल'मधून बाहेर पडलेले कित्येकजण आज कलाकार म्हणून नावारूपाला आले आहेत, तर अशा या संतोष पवारने सन २०२२ मध्ये 'हीच तर फॅमिलीची गंमत आहे' नामक नाटकाचा घाट घातला होता. या नाटकाचे १७४ प्रयोग झाल्यानंतर दोन वर्षांनी काही कारणांमुळे हे नाटक थांबले. मात्र असे असले, तरी संतोष पवारच्या बाबतीत 'थांबणे' हा प्रकार संभवत नसल्याने, त्याने आता स्वकर्तृत्वावर हे नाटक रंगभूमीवर आणण्याचा विडा उचलला आहे. फक्त नाटकाच्या शीर्षकात थोडा बदल करत, 'हीच खरी फॅमिलीची गंमत आहे' या नावाने संतोष पवार हे नाटक रंगभूमीवर घेऊन येण्यास सज्ज झाला असून, त्याच्या या 'फॅमिली'चा रंगभूमीवर 'पुन्हारंभ' होत आहे.

आता ही सर्व जबाबदारी सांभाळण्यासाठी संतोषला मोठी कसरत, तर करावी लागणार, हे त्यासोबत आलेच. पण 'नाही' हा शब्द त्याच्या शब्दकोशात नसल्याने, त्याने मोठ्या उत्साहाने या नाटकाची तयारी सुरू केली आहे. नाटकाचे लेखन व दिग्दर्शन अर्थातच संतोष पवार याचे आहे. तीन वर्षांपूर्वी आलेल्या या नाटकातले कलावंत सागर कारंडे व शलाका पवार हे यावेळीही यात भूमिका साकारत आहेत. विशेष बाब ही की स्वतः संतोष पवार सुद्धा या नाटकात भूमिका रंगवत आहे. या मंडळींसह हर्षदा कर्वे, प्रतीक पाध्ये, विनिषा कुळकर्णी व राकेश शालिनी हे नव्या दमाचे कलाकार या नाटकात काम करताना दिसणार आहेत. 'हीच खरी फॅमिलीची गंमत आहे' या नाटकात दोन कुटुंबांत घडणारी धमाल लेखक व दिग्दर्शक संतोष पवार याने रंगवली आहे. साहजिकच, या सर्व मंडळींचे हे नाटक म्हणजे त्यांच्या चाहत्यांसाठी खास मेजवानी ठरणार आहे.

एकूणच जुळवून आणलेल्या या सगळ्या 'प्रयोगा'विषयी जाणून घेण्यासाठी संतोष पवार याच्याशी संवाद साधणे ओघाने आलेच. संतोष म्हणतो, "आमचे हे नाटक सन २०२२ ला सुरू होऊन सन २०२४ मध्ये थांबले; मात्र यावर्षी मी नक्की ठरवले की आपणच याबाबत काहीतरी हालचाल करू या. आता हे नाटक मी माझ्या प्रयत्नाने सुरू करतोय. मी आणि शलाका मिळून हे नाटक उभे करत असताना, सागर कारंडेचे सहकार्यही मला मिळाले आहे. आम्हाला सगळे कलाकार आणि तंत्रज्ञ कायमच मदत करत असतात म्हणून हे नाटक करण्याचे आम्ही डेअरिंग करतोय. माझा प्रेक्षकांवर विश्वास आहे आणि त्या बळावरच मी आजपर्यंत माझी वाटचाल केली आहे. मला माहीत आहे की, अभिनेता म्हणून मी माझ्यावर आतापर्यंत खूप अन्याय केला आहे. माझ्या नाटकात मी कधी काम करत नव्हतो. फक्त कुणा कलाकाराचा काही प्रॉब्लेम झाला की त्याच्या जागी जाऊन मी काम करायचो. पण जेव्हा मी नाटकात पहिल्यांदा भूमिका केली; तेव्हा मला कळले की माझे कामही प्रेक्षकांना आवडते. यातून मी काही नाटकांत भूमिका केल्या, त्या प्रेक्षकांना आवडल्या, खूप बक्षीसेही मिळाली आणि मग मला कळले की आपण भूमिकाही करू शकतो. आता 'हीच खरी फॅमिलीची गंमत आहे' हे नाटक नव्याने करताना नाटकाचे नेपथ्य, संगीत पूर्णतः नवीन केले आहे. कॉस्च्युम्स, प्रॉपर्टी सर्व काही नवीन आहे. नाटकाचा पहिला प्रयोग, एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नागपूर येथे होणाऱ्या १०० व्या विभागीय अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनात आम्ही करत आहोत आणि त्यानंतर सर्वत्र आम्ही हे नाटक करणार आहोत".

# 'वजनदार' भूमिकेतून अलका कुबल यांचे रंगभूमीवर पुनरागमन



लठ्ठ असणं कुणालाच फारसं प्रिय नसतं. आपल्या लठ्ठपणाचा कॉम्प्लेक्स अनेकांना येत असतो. बारीक होण्याची धडपड. त्यासाठी चालणं, सायकलिंग, डाएटचे वेगवेगळे प्रकार, औषधं, जिम आणि बरंच काही... सुरू असतं. याच लठ्ठपणावर भाष्य करणारं 'अष्टविनायक' आणि 'विप्रा क्रिएशन्स' यांची प्रस्तुती असलेलं एक 'वजनदार' नाटक रंगभूमीवर येऊ घातलं आहे. विशेष म्हणजे या नाटकाच्या निमित्ताने मनोरंजनसृष्टीत आपल्या खणखणीत 'वजनदार' अभिनयाच ठसा उमटविणाऱ्या अभिनेत्री अलका कुबल या नाटकाच्या निमित्ताने २७ वर्षांनी त्या पुन्हा रंगभूमीकडे वळल्या आहेत. एका मोठ्या कालावधीनंतर रंगभूमीवर परतणाऱ्या अलकाजी या नाटकाविषयी फारच उत्सुक आहेत. आपल्या कमबॅक विषयी बोलताना त्या सांगतात की, २७ वर्षांपूर्वी मी केलेल्या सुधीर भटांच्या 'साष्टांग नमस्कार' या नाटकानंतर पुन्हा रंगभूमीवर मला काम करायचेच होते 'वजनदार' या नाटकाच्या निमित्ताने मला ही संधी मिळाली. या नाटकाच्या शुभारंभाच्या प्रयोगाची उत्सुकता आहेच. माझी भूमिका प्रेक्षक नक्कीच एन्जॉय करतील असा विश्वासही अलका यांनी व्यक्त केला

वेगवेगळ्या सकस नाट्यकृती नाट्यरसिकांसाठी आणणाऱ्या 'अष्टविनायक' संस्थेने विप्रा क्रिएशन्स'च्या साथीने आणलेल्या 'वजनदार' नाट्यकृतीचा शुभारंभ येत्या २४ एप्रिलला यशवंत नाट्यमंदिर माटुंगा येथे दुपारी ४.०० वा. होणार आहे.

मनोरंजनसृष्टीतल्या दोन नावाजलेल्या गुणी अभिनेत्री संपदा कुलकर्णी-जोगळेकर आणि अलका कुबल 'वजनदार' नाटकाच्या निमित्ताने एकत्र आल्या आहेत. संपदा कुलकर्णी-जोगळेकर लिखित आणि संतोष वेरूळकर दिग्दर्शित या नाटकात अभिनेत्री अलका कुबल मध्यवर्ती भूमिकेत दिसणार आहेत. अलका कुबल यांच्यासह अभिषेक देशमुख, साक्षी पाटील, अभय जोशी, पूनम सरोदे आदि कलाकार यात आहेत.

संध्या रोठे, प्रांजली मते, दिलीप जाधव यांनी 'वजनदार' या नाटकाची निर्मिती केली आहे. संगीत मंदार देशपांडे यांचे आहे. नेपथ्य सचिन गावकर, तर प्रकाश योजना अमोघ फडके यांची आहे. वेशभूषा हर्षदा बोरकर, तर रंगभूषा कमलेश बिचे यांची आहे.

# श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड दत्तक घ्यावा

## पंकज मुंडे

### घाटशीळ पारगांवात फिरता नारळी सप्ताह

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या विकासा करिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पूर्वीपासूनच खूप सहकार्य लाभले आहे, मी पालकमंत्री असताना त्यांच्या सहकार्यामुळेच इथली कामे करू शकले. मुख्यमंत्र्यांनी आता हा गड दत्तक घ्यावा, अशी अपेक्षा राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री आपल्या सोबत आहेत, त्यामुळे येत्या काळात बीड जिल्हा नक्कीच सुफलाम् सुफलाम होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

शिरूर कासार तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांचा ९३ वा नारळी सप्ताहाची सांगता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत मोठया उत्साहात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी मठाधिपती विठ्ठल बाबा महाराज, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, आ. सुरेश धस, आ. नमिता मुंदडा, आ. मोनिका राजळे, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार भीमराव धोंडे, सरपंच नवनाथ खेडकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना ना. पंकजाताई म्हणाल्या, हा जिल्हा दुष्काळी आहे, इथल्या लोकांना सन्मार्ग आणि भक्ती मार्गाकडे नेण्यासाठी संत वामनभाऊ, संत भगवान बाबा यांनी नारळी सप्ताहाची परंपरा सुरू केली. ही परंपरा थोर आहे, ती आजही अखंडपणे सुरू आहे. त्यामुळे या भागातील लोकांना आध्यात्मिक गोडी निर्माण झाली आहे. गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी तसेच बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण पान २ वर



### मुंडे साहेबांचे नाव कधीही कमी होऊ देणार नाही

मी राजकारणात आले त्यावेळी लोकनेते मुंडे साहेबांनी मला या गडावर आणले होते, एक दोन वेळा मला अडचणीमुळे गडावर येता आले नव्हते पण दरवर्षी मी गडावर एक भक्त म्हणून आवर्जून येते. गडाच्या विकासाकरिता सातत्याने प्रयत्न केले. मुंडे साहेबांचे संस्कार असल्याने सर्व सामान्यांसाठी तसेच समाजातील सर्व घटकांसाठी मी नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे व पुढेही राहिल. मुंडे साहेबांचे नाव मी कधीही कमी होऊ देणार नाही, असंच काम माझ्या हातून होईल असं ना. पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.

# शॉर्टसर्किटमुळे गोठा भस्मसात

डॉ.गणेश ढवळे:शेतकऱ्याचे अडीच लाखांचे नुकसान



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:तालुक्यातील वाघिरा येथील रहिवासी बापुराव नरहरी आजबे यांचे लिंबागणेश येथील काळवाडी शिवारात गट नंबर २८० मध्ये शेतीजमिन असुन काल शार्टसर्कीटमुळे लागलेल्या आगीत त्यांचा गोठा आणि गोठ्यातील शेतीमाल कांदा, २ एक्करमधील गोळा केलेले ठिबक तसेच १ एक्कर मधील स्प्रिंकलर, शेतीकामासाठी आवश्यक आवजारे आणि सागवानाची झाडे यांचे एकुण जवळपास अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले असुन गोठ्याच्या जवळुन जाणाऱ्या विद्युत तारेच्या शार्टसर्कीटमुळे आग लागल्याचे शेतकरी बापुराव नरहरी आजबे यांनी म्हटले आहे. आज दि.१९ रोजी सकाळी त्यांचा मुलगा शेतावर घरी पाणी नेण्यासाठी आला असता गोठा आगीत भस्मसात झाल्याचे कळाले. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी संबंधित प्रकरणात फोटो आणि व्हिडिओ तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना पाठवुन पान २ वर

# कन्हेरवाडी जयभीम महोत्सव

कार्यक्रम:डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील कन्हेरवाडी येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ,बोधिसत्व,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्सव निमित्ताने १४ एप्रिल रोजी अभिवादन करण्यात आले.या वेळी सर्व प्रथम तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीचे पुजन श्री.शिव छत्रपती वाचनालयाचे संस्थापक निवृत्ती जगताप यांच्या हस्ते करण्यात आले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन प्रा.विलास जगताप सर यांच्या हस्ते करण्यात आले तर ध्वजारोहन निवृत्त मेजर अनंत कवडे यांच्या हस्ते केले याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब, रमाबाई आंबेडकर, सावित्रीबाई फुले , अहिल्याबाई होळकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच ड .रामराजे जाधव, पत्रकार रामराजे जगताप,सागर डोलारे,ग्रा प. सदस्य उदय मोरे,रवि कवडे,राजेश काळे, सोसायटी संचालक विठ्ठल धोंगडे, माजी चेअरमन माणिकराव मिटकरी व इतर मान्यवर यांच्याहस्ते करण्यात आले तसेच शहीद जवान सावकार सावंत यांच्या समाधीचे पुजन अक्षय सावंत, प्रताप सावंत, पत्रकार रामराजे जगताप, बाळासाहेब माणिक सावंत यांच्या हस्ते करण्यात आले व मानवंदना घेण्यात आली या वेळी गावातील प्रतिष्ठीत मंडळी यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.हा कार्यक्रम पान २ वर



# सीमा ओस्तवाल यांचे कौतूक

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शहरातील सामाजिक न्याय भवन येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून नुकत्याच पार पडलेल्या व्याख्यान मालेचे चौथे पुष्प गुंपण्यासाठी धम्मसंघनी रमागोरख नागपूर यांच्या व्याख्यानचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हूणन गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सिमा ओस्तवाल यांना आमंत्रित करण्यात आले होते.

झेडपी शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना दरवर्षी मोफत वह्या- पेन वाटप, तसेच दिवाळी,रमजानच्या निमित्ताने गरजू लोकांना मोफत किराणा वाटप करत आलेल्या आहेत. विद्यार्थी प्रिय समाज पान २ वर

# रायमोहा येथे जयभीम महोत्सव

उपक्रम:पंचशील महिला मंडळाकडून जयंती

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती संपूर्ण देशात मोठ्या उत्साहात आणि सार्वजनिक स्वरुपात साजरी केली जाते त्याच अनुषंगाने रायमोहा ता.शिरुर (का) येथे पंचशील महिला मंडळाच्या वतीने पाच दिवशीय जयंती सोहळा विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन आनंदाने साजरा करण्यात आला.



यामध्ये पहिल्या दिवशी दि. १३ एप्रिल रोजी धम्म ज्ञान स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली होती, दुसऱ्या दिवशी दि. १४ एप्रिल रोजी सकाळी पंचशील ध्वजारोहण करण्यात आले तर दुपारच्या सत्रात महिलांच्या विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तिसऱ्या दिवशी म्हणजे दि. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ७:०० वा सामाजिक कार्यकर्ते मनिषा ताई तोकले तसेच प्रा. अशोक मुंडे यांचे व्याख्यान बाजार तळ रायमोहा येथे संपन्न झाले.चौथ्या दि. १६ एप्रिल रोजी सायंकाळी ७:०० वा. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक काढण्यात आली आणि पाचव्या दिवशी दि.१७ एप्रिल रोजी सकाळी १०. वा महिलांसाठी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.अशा प्रकारे प्रथमच रायमोहा येथे पाच दिवशीय जयंती सोहळा पंचशील महिला मंडळ अध्यक्ष – पुष्पा सुतार , उपाध्यक्ष – सुरेखा सुतार , सचिव – आशा सोनवणे , आणि सर्व पदाधिकारी सदस्या , भिम कन्या ग्रुप आणि भीमरत्न ग्रुप व सर्व गावकरी मंडळींच्या वतीने साजरा करण्यात आला.

# पाटोदामध्ये पत्रकार संघाची बैठक

निर्णय:सदस्य ठरले सर्वसामान्यांचे आवाज



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:मराठी पत्रकार परिषदेच्या नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा निवडणुकांमध्ये पाटोदा तालुक्याचे सचिन पवार व कादर मकरानी यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पाटोदा शाखेच्या वतीने त्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. हा सत्कार सोहळा पाटोदा येथील विश्रामगृहात मोठ्या उत्साहात पार पडला.या वेळी आयोजित बैठकीत पत्रकारांच्या समस्या, त्यांचे हक्क आणि पत्रकार भवन उभारणीसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. येत्या गुरुवारी पत्रकार भवन संदर्भात ठोस निर्णय घेण्याचा निर्धारही यावेळी करण्यात आला.

बैठकीत उपस्थित सदस्यांनी सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने लेखणीच्या माध्यमातून आवाज उठवण्याचे वचन दिले. कोणताही अधिकारी जनतेची अडवणूक करत असल्यास त्याला पत्रकारांनी लेखणीच्या ताकदीने जागं करावे, असे ठरवण्यात आले.या बैठकीत जिल्हा उपाध्यक्ष कादर पान २ वर

# केजमध्ये केविसंसचे धरणे आंदोलन!

निवेदन:बसस्थानकासाठी उचलले आक्रमक पाऊल

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:शहर खामगाव-पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर या दोन प्रमुख महामार्गाच्या जोडणीवर असल्याने येथून दररोज हजारो प्रवासी महाराष्ट्राच्या कानाकोऱ्यात ये-जा करत असतात. किल्लेधारूर चे बसआगार केजसाठी सोयीचे नाही. तसेच येथून दूर पल्याच्या गाड्या केज येथून सुटणे गरजेचं आहे. यासाठीच केज येथे राज्यपरिवहन मंडळाचे 'बसआगार' सुरू करावे या मागणीसाठी केज विकास संघर्ष समिती गेली पंधरा वर्षांपासून पाठपुरावा करत आहे. यासाठी समितीने सतत लेखी निवेदने व तोंडी विनंती करूनही अद्याप कार्यवाही झालेली नाही. यासाठी पुन्हा एकदा येत्या मंगळवार दि २२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता केज तहसील कार्यालयासमोर धरणे व उपोषण आंदोलन सुरू करणार आहे. केज येथे बसआगारासाठी ७ एक्कर हुन अधिक जागा केज बीड महामार्गालगत आरक्षित आहे. मात्र राज्यपरिवहन मंडळाच्या हलगर्जीपणा मुळे ही जागा सध्या पडून आहे. हळू हळू ही जागा आता अतिक्रमण धारकांच्या विळख्यात जाऊ शकते. यासाठी या जागेवर 'बसआगार' स्थापित करावे तसेच आता इलेक्ट्रिक बसगाड्यांची वाढती संख्या पाहता याच जागेत अशा बसगाड्या इलेक्ट्रिक चार्जिंग सेंटर सुरू करण्याची मागणी समितीने केली आहे. किमान आतातरी शासनाने वरिष्ठ पातळीवर केजच्या बसडेपो स्थापित करून येथे मोठे इलेक्ट्रिक बसगाड्या चार्जिंग सेंटर सुरू करावी अशी समितीने मागणी समितीने केली आहे. या आंदोलनात केजवासीयांची मोठ्या संख्येने सहभागी पान २ वर




# खामसवाडी येथे सत्कार समारंभ

कार्यक्रम:राम शेळके,अरुण सोनारांचा सत्कार



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील खामसवाडी येथील छत्रपती राजर्षी शाहू मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.च्या वतीने जगदंबा कन्या प्रशाला खामसवाडी शाळेमधून ३१ जानेवारी २०२५ रोजी सेवानिवृत्त झाल्याने सेवानिवृत्त शिक्षक राम निवृती शेळके व अरुण नारायण सोनार हे दि.२८ फेब्रुवारी २०२५ रोजी आरोग्य पर्यवेक्षक पंचायत समिती (वाशी) येथे कार्यरत होते. हे दोघेही सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा आज दि.१८ एप्रिल २०२५ रोजी छत्रपती राजर्षी शाहू महाराज मल्टीस्टेट खामसवाडी शाखेमध्ये मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सदरील सत्कार सरस्वती विद्यालय गोविंदपुर चे मुख्याध्यापक बन्सी शेळके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिक्षक श्रीमंत पाटील, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत पाटील, पत्रकार शिवाजी बोबडे, शिक्षक राम शेळके, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे सचिव विजयकुमार देशमाने, मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक पान २ वर

## मागणी

### पुरवठा विभागाने कारवाई करावी

# स्वस्त धान्य दुकानदाराची मनमानी!

पुण्यभूमी प्रतिनिधी

अंबाजोगाई:तालुक्यातील पाटोदा (म) येथील स्वस्त धान्य दुकानदार शाम झिरमिरे यांच्या मनमानीला गावकरी त्रस्त झाले असून राशन येऊन सुद्धा लवकर वाटप न करणे,पावती न देणे, शाम झिरमिरे हे अंबाजोगाई येथे वास्तव्यास असतात आणि गावात नोकरांच्या हातून राशन वाटप करतात.आलेला उतरून घेताना हजर नसतात.माल काळ्या बाजारात विकत असल्याचा संशय गावकऱ्यांनी व्यक्त केला आहे.स्वस्त धान्य दुकान नेहमीच उशिराने उघडत असल्याची लाभार्थ्यांची तक्रार आहे.पाच ते सहा दिवस माल येऊन सुद्धा अजूनही राशन वाटप न झाल्याने हे स्वस्त धान्य दुकानदार गोरगरीब पान २ वर



शाम झिर मिरे हे अंबाजोगाईलां राहतात आणि धान्य नोकरांकडून वाटप करतात.हे नोकर लाभार्थ्यांना अरेरावी करतात.राशन येऊन पाच ते सहा दिवस होऊन सुध्दा यांनी वाटप केले नाही. त्यामुळे गरीब लोकांना धान्यापासून वंचित राहावे लागत आहे.यांच्या पुरवठा विभागाने कार्यवाही करावी अशी आमची मागणी लाभार्थ्यांमधून होत आहे.

### फलक फक्त देखाव्यापुरता...

शहरातीलस्वस्त धान्य दुकानांची पाहणी केली असता दुकाने सुरू ठेवण्याची वेळ सकाळी ते १२ दुपारी ते असल्याच्या माहितीचे फलक लावण्यात आल्याचे आढळले. प्रत्यक्षात मात्र शहरातील अनेक दुकाने सकाळी १० सायंकाळी नंतरच खुले होत असल्याचे समोर आले. दुकानाच्या अनियमिततेमुळे अनेकांना आपल्या कार्डावरच्या धान्यावर पाणी सोडावे लागते. नागरिकांच्या होणाऱ्या गैरसोयीकडे पुरवठा विभागाने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

# जल व्यवस्थापनसाठी ;जलसंपदा विभागाची गावागावात जनजागृती



आष्टी/प्रतिनिधी

राज्य शासनाने भविष्यात पाण्याची होणारी टंचाई व यावर मात करण्यासाठी आत्ताच त्याचे व्यवस्थापन कसे करायचे याचे पंधरवडा नाहीतर कायम स्वरूपी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.यासाठी जलसंपदा विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या जल व्यवस्थापन च्या जनजागृती अभियानात गावकऱ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद असल्याचे आष्टी येथील जलसंपदा विभागाचे उप अभियंता विजय पारखे यांनी केले आहे.

जल व्यवस्थापन कृती पंधरवडा दिनांक १५ ते ३० एप्रिल२०२५ या कालावधीमध्ये जलसंपदा विभागामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.शुक्रवार (दि.१९) रोजी आष्टी तालुक्यातील वाळुंज येथे ते शेतक-यांना मार्गदर्शन करतांना पारखे बोलत होते.यावेळी रोहिणी दरेकर,बबन झगडे,राजू आजबे,कोमल कांबळे,रोहन हाडोळे,देविदास गुंड,व्यंकट दांडगे, कविता आमदार, पान २ वर